

# राजर्षी शाहू

## वसा आणि वारसा

ॲड्. गोविंद पानसरे

MR
923.6
P 195 R

MR
923.6
P195R

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# राजर्षी शाहू : वसा आणि वारसा

ॲड्. गोविंद पानसरे

इन्दराज
Entered

लोकवाङ्मय गृह

राजर्षी शाहू : वसा आणि वारसा / ॲड्. गोविंद पानसरे
Rajarshi Shahu : Vasa Ani Varasa / Adv. Govind Pansare

Library IIAS, Shimla
MR 923.6 P 195 R
00124266

म / ९७५
© गोविंद पानसरे
तिसरी आवृत्ती (I) : जानेवारी २००७
दुसरी आवृत्ती : श्रमिक प्रतिष्ठान, ऑगस्ट २००३

MR
923.6
P195R

किंमत : ५० रुपये
ISBN 81-82284-89-0

124266
31.3.08

मुद्रक/प्रकाशक
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई-४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई-४०० ०२५

# पहिल्या आवृत्तीचे निवेदन

कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत अत्यंत मोलाची अशी भूमिका बजावली आहे. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत महाराजांनी अखिल भारतातील परिवर्तनवादी चळवळींना चालना दिली, त्यांना प्रोत्साहन दिले आणि लोकांच्या मनातील लोकशाही आकांक्षा जागृत केल्या. शाहू महाराष्ट्रातील परिवर्तनवादी विचारांचे आणि आचारांचे भोक्ते होते. त्यांच्या विचारांचे सम्यक आकलन करून घेण्यासाठी व आम जनतेला त्यांच्या कार्याचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी प्रस्तुत पुस्तिका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे एक ज्येष्ठ नेते व कामगार पुढारी कॉ. गोविंदराव पानसरे यांनी लिहिली आहे. काही वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांवरही त्यांनी अशाच प्रकारचे पुस्तक लिहिले होते. त्या पुस्तकाच्या अक्षरश: हजारो प्रती खपल्या. शिवाजीकडे पाहण्याचा, त्याचे जीवनरहस्य समजावून घेण्याचा नवा दृष्टिकोन त्यामुळे लोकांना मिळाला. राजर्षी शाहूंवरील पुस्तक लिहिताना त्यांनी हाच दृष्टिकोन आपल्यासमोर ठेवला आहे.

कॉ. पानसरे यांच्या मते इतिहासातील थोर पुरुषांना शेंदूर फासून, त्यांची एक विशिष्ट सबगोलंकारी प्रतिमा तयार करून त्यांचा विचार मारण्याचा प्रयत्न इतिहासात सातत्याने होत असतो. कारण समाजातील वरच्या थरांना त्यांची समाजात असणारी लोकप्रियता व मान्यता स्वत:च्या स्वार्थासाठी वापरायची असते. त्यामुळे ही प्रतिमा गुळगुळीत होते; तिची वैचारिक बंडखोरी आणि प्रागतिकता नष्ट होते आणि समाजाच्या दृष्टीने तिची अर्थहीन मूर्तिपूजा चालू राहते. महाराजांच्या विचारांना लखलखीत स्वरूपात नि:संदिग्धपणे मांडण्यासाठी, त्यांचे प्रगतिशील विचार लोकांना समजावून देण्यासाठी हे पुस्तक लिहिले आहे.

राजर्षी शाहू महाराज एका विशिष्ट अशा वासाहतिक समाजात जन्मास आले. त्यांचे राजपद साम्राज्यवाद्यांनी मर्यादित केलेले होते आणि वसाहतवादाने व सरंजामशाहीने निर्माण केलेल्या सामाजिक व आर्थिक अंतर्विरोधांना त्यांना तोंड द्यायचे होते. या वेळी महाराजांनी आपल्या पद्धतीने हे अंतर्विरोध समजून घेतले आणि आपल्या परीने त्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला. वसाहतवादी व्यवस्थेत निर्माण झालेल्या जातिग्रस्त सरंजामशाहीविरुद्ध त्यांनी संघर्ष केला आणि लोकशाही विकासाचे नवे विकासक्रम जन्मास घातले. समाजातील मागासवर्गात अधिकाराबाबत जागृती निर्माण केली.

राजर्षी शाहू महाराज विचाराने एका विचारप्रवाहाशी बांधलेले नव्हते. ते सत्यशोधकही नव्हते व आर्यसमाजिस्टही नव्हते. त्यांना ज्या गोष्टी आपल्या कार्यास उपकारक वाटत त्यांचा ते स्वीकार करीत. सत्यशोधक समाजाचे ते चाहते होते. ते जोतीबांची गणना दयानंद व केशवचंद्रांबरोबर करून त्यांना सद्धर्माचे पुरस्कर्ते मानीत. प्रस्थापित व्यवस्थेचा जोतीबांनी केलेला मर्मभेद त्यांना आवडला. त्यामुळे धर्मसुधारणा, अंधश्रद्धाविरोध, जातिनिर्मूलन, राजकीय सत्तेत समान वाटा, राखीव जागा, शेतीसुधारणा व अधिकारासाठी संघर्ष या सत्यशोधकी विचारांचा त्यांनी स्वीकार केला आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. पण नंतरच्या सत्यशोधकांचा अतिरेक त्यांना मान्य नव्हता. या मार्गाने सुधारणा होणार नाही; सत्यशोधकांचा मार्ग 'शठं प्रति शाठ्यं' पद्धतीचा आहे; असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे सत्यशोधकांना प्रोत्साहन देत असतानाच त्यांच्या कार्यातील मर्यादा शाहूंनी ओळखल्या होत्या.

आर्यसमाजाबद्दल त्यांच्या मनात राजा प्रतापसिंग यांनी पूज्यभाव निर्माण केला. आर्यसमाजातील वेदप्रामाण्य, यज्ञाचे स्तोम व शुद्धी चळवळ या गोष्टी महाराजांना फारशा भावल्या नाहीत. याउलट वेदांचे हक्क सर्वांना देण्याची तयारी, स्त्री-पुरुष समता, जातिवाद, शिक्षणाचा प्रसार व मागास जातींच्या उन्नतीचे प्रयत्न यामुळे त्यांच्या मनात आर्यसमाजाबाबत आपुलकी होती. उत्तर भारतातील जाट, यादव, अहीर व कुर्मी या मागास जातींच्या विकासात आर्यसमाजाची भूमिका महत्त्वाची होती.

न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले आणि इतर समाजसुधारकांबद्दल त्यांच्या मनात पूज्य बुद्धी होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची त्यांची मागणी आपणास मान्य आहे, असे त्यांचे मत होते.

विसाव्या शतकात देशभर मागास व मध्यम शेतकरी जातींमध्ये चळवळी सुरू झाल्या. या चळवळी लोकांच्या चार महत्त्वाच्या मागण्यांभोवती उभ्या होत्या.

१. क्षत्रियत्वाची मागणी व वेदोक्ताचा हक्क.

२. शिक्षणाचा प्रसार व वसतिगृहांची स्थापना.

३. आत्मोद्धारार्थ जातवार संघटनांची स्थापना.

४. राजकीय जीवनात सहभाग वाढवण्यासाठी सरकारी नोकऱ्यांत व विधिमंडळांत मागास ज़ातींसाठी राखीव जागा निर्माण करणे.

या सर्व चळवळींना आत्मसन्मानाच्या चळवळी समजण्यात येई. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ, केरळातील एस. एन. डी. पी. चळवळ, आंध्रातील व कर्नाटकातील मागासजातींची चळवळ, तामिळनाडूतील जस्टीस पार्टीची व नाडार संघमची चळवळ, उत्तर भारतातील अहिर क्षत्रियांची व कुर्मी क्षत्रियांची चळवळ तसेच महाराष्ट्रातील व भारतातील निराश्रितांची किंवा दलितांची चळवळ या चळवळींचा त्यात समावेश होतो. या चळवळींनी वेगवेगळ्या समाजातील घटकांना जागृत केले; त्यांना नव्या जाणिवा दिल्या. या चळवळींना वैचारिक व प्रत्यक्ष सहकार्य करून महाराजांनी पाठिंबा दिला. त्यांनी पुढे मांडलेल्या मागण्या महाराजांना मान्य होत्या आणि आयुष्यभर त्या पुढे रेटण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

शाहू महाराजांनी दक्षिणेतील जस्टीस पार्टीच्या चळवळीस पाठिंबा दिला आणि कर्नाटकातील लिंगायत जमातीतील चळवळीस प्रोत्साहन दिले. महाराष्ट्रात त्यांनी माणगाव परिषदेत डॉ. आंबेडकरांना पाठिंबा दिला आणि ब्राह्मणेतर चळवळीस दृढ करण्याचा प्रयत्न केला. उत्तरेत त्यांनी कुर्मी क्षत्रियांच्या व अहिर क्षत्रियांच्या संघटनांना पाठिंबा दिला. त्यांच्या मेळाव्यात जाऊन त्यांना विकास करण्यास प्रोत्साहित केले. त्यांना श्रमाचे महत्त्व सांगून सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार असणाऱ्या स्वराज्याच्या मागणीचा त्यांनी पुरस्कार केला. हा मुद्दा स्पष्ट होता. या सर्व चळवळी समाजात परिवर्तन घडवून आणणाऱ्या होत्या. त्यात जातवार उतरंडीची उलथापालथ अपेक्षित होती आणि या उलथापालथीच्या धोरणास महाराजांचा पाठिंबा होता. हा पाठिंबा केवळ महाराष्ट्रापुरताच मर्यादित नव्हता; तर तो उत्तर भारतात व दक्षिण भारतातील प्रागतिक चळवळींना देण्यात आला होता.

एका वासाहतिक समाजात राजेपदाच्या व परिस्थितीच्या मर्यादा लक्षात घेता शाहू महाराजांचे कार्य अनन्यसाधारण असेच होते. त्याबाबत बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड, म्हैसूरचे राजे कृष्णराज वाडियार, त्रावणकोरचे राजे यांचे कार्यही लक्षणीय असेच आहे. या सर्व महाराजांनी आपापल्या परीने आपल्या समाजातील दीनदलितांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. स्वराज्याच्या चळवळीस महाराजांचा तत्त्वत: विरोध नव्हता, पण दुर्दैवाने लोकमान्य टिळकांनी वेदोक्ताबाबत हटवादी आणि प्रतिगामी भूमिका घेतल्यामुळे परिस्थिती बिघडली.

या वेळी टिळकांनी व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोन न स्वीकारल्यामुळे महाराष्ट्राची मोठीच हानी झाली. टिळक व शाहू या दोन लोकोत्तर पुरुषांतील बेबनावाचा फायदा धूर्त इंग्रज साम्राज्यवाद्यांनी उचलला आणि हे संबंध जास्तीत जास्त कलुषित कसे होतील हे पाहिले. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रात शाहूंची प्रतिमा मलिन करण्याचे प्रयत्न झाले.

आजच्या संदर्भात राजर्षी शाहू महाराजांचा वसा आणि वारसा कोणता हे आपणास पाहावे लागेल. त्यांच्या विचारांचा वसा घ्यावयास अनेक जण पुढे आले, पण त्यांना तो पेलला नाही. तो त्यांनी टाकून दिला. विचारांचा वारसा प्रतिमापूजनापुरताच मर्यादित राहतो की काय, अशी शंका निर्माण झाली आहे. या अशा मोक्याच्या वेळी कॉ. गोविंदराव पानसरे यांनी शाहूंच्या विचारांचा वसा व वारसा समजावून सांगण्यासाठी हे पुस्तक खूप अभ्यास करून लिहिले आहे. त्यांची भाषा सोपी, प्रतिपादन स्पष्ट व सरळ आणि शैली हृदयंगम आहे. त्यामुळे त्यांचे सर्व वाचक स्वागत करतील अशी उमेद वाटते.

राजर्षी शाहूंच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या शाहू महोत्सवानिमित्त हे पुस्तक प्रकाशित करण्यास समाजवादी प्रबोधिनीस आनंद होतो आहे. कारण विसाव्या शतकाच्या अखेरीस आपल्या पूर्वसूरींना वाट पुसतच पुढची वाटचाल आपणास करावयाची आहे. या पुस्तकाचा त्या दृष्टीने नक्कीच उपयोग होईल.

**अशोक चौसाळकर**

# झाले बहु... परि यासम हा

इतिहासजमा होऊन फक्त संशोधकांसाठी उरलेले राजे भारतात असंख्य होऊन गेले. असे राजे महाराष्ट्रातही बरेच होते. त्यांची जागा इतिहासातच होती, म्हणून भारतीय जनतेने राजेशाही नाहीशी केली आणि लोकशाही आणली.

परंतु ज्यांनी इतिहास घडवला, जे आजच्या वर्तमानातही शिल्लक आहेत आणि भविष्य घडवण्याच्या कार्यातसुद्धा जे अजून सहभागी आहेत असे राजे महाराष्ट्रात दोनच. एक स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरे कर्ते समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज.

## झाले बहु... परि यासम हा

इतिहासाची पाने उजळवणाऱ्या, वर्तमानातही विचारात घेणे भाग पडत असणाऱ्या आणि भविष्य घडवण्यातही सहभागी असणाऱ्या या दोन महामानवांत असे काय होते की, ज्यामुळे राजेशाहीच्या जमान्यात होंऊन गेलेल्या या राजांना लोकशाहीतही असे अद्वितीय स्थान मिळाले आहे? राजे असूनसुद्धा त्यांनी रयतेचा केलेला विचार, रयतेसाठी केलेला विचार, रयतेसाठी केलेला व्यवहार आणि त्यांच्या समकालीनांपेक्षा कितीतरी दूरदृष्टी ठेवून गाजवलेले कर्तृत्व या गोष्टींमुळे त्यांना हे स्थान मिळाले आहे.

रयत म्हणजे अर्थातच बहुसंख्य प्रजा. आजच्या भाषेत बहुजन समाज आणि त्यातील दीनदुबळे, मागासलेले विभाग. रयतेची कणव आणि रयतेचाच विचार. प्रत्येक व्यवहारात केंद्रस्थानी रयत. जे काही करायचे ते रयतेसाठी. ही या महापुरुषांची समान सूत्रे होती.

रयतेची बाजू घेऊन शाहू राजांनी वरिष्ठ वर्णाशी संघर्ष केला होता. त्यासाठी

खोटीनाटी टीका व प्रत्यक्ष त्रास सहन केला होता. असा संघर्ष करणाऱ्यांच्या संघर्षातही शाहू महाराज सहभागी झाले होते.

'विद्येत मागासलेल्या वर्गां'च्या जाहीर सभांमधून शाहू महाराजांनी भाषणे करून जागृती निर्माण केली होती. उत्तर प्रदेशातील कुर्मी समाज परिषदेत आणि डॉ. आंबेडकरांबरोबर माणगावच्या अस्पृश्यवर्गाच्या परिषदेत मार्गदर्शन केले होते. 'निराश्रित सोमवंशीय समाजाच्या सभा', 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद', 'अखिल भारतीय अस्पृश्य परिषद', 'कर्नाटक ब्राह्मणेतर परिषद', 'ज्ञानवर्धक सभा' या आणि अशा नावांच्या व्यासपीठांवरून शाहू महाराजांनी समाजातील त्या त्या विभागांशी जवळीक साधली होती.

या सभा आणि संस्थांची नावे त्यांचे स्वरूप आणि कार्ये स्पष्ट करणारी आहेत. या सभा, संस्था आणि परिषदा कुणाच्या होत्या आणि कशासाठी होत्या हे त्यांच्या नावांवरून अगदी स्पष्ट होते.

आजच्यासारखी फसवी नावे धारण करण्याची पद्धत त्या काळात आली नव्हती.

शाहू महाराजांनी समाजाच्या कोणत्या विभागासाठी कार्य केले हे स्पष्ट आहे.

## त्यांचे कार्य अपुरे आहे

शाहू महाराज आणि तत्सम इतरांनी केलेले कार्य अजून पूर्ण व्हायचे आहे. आजही रयत दुबळी आणि पीडित-शोषितच आहे. आजही बहुसंख्य प्रजा, बहुजन समाज, दीनदुबळे, दलित, शोषित यांची अवस्था शोचनीयच आहे. आजही विषमता आहे. वरच्या वर्णाचे आणि वरच्या वर्गाचे शोषणकार्य आजही सुरूच आहे. वरच्यांच्या या शोषणाविरुद्ध तळचे समाज आजही संघर्ष करीत आहेत आणि म्हणूनच शाहू महाराजांचा विचार आणि त्यांचा व्यवहार आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांची आजही गरज आहे.

त्यांच्या विचारांची गरज रयतेला आहे, अस्पृश्यांना आहे, विद्येत मागासलेल्यांना आहे, निराश्रितांना आहे, बहिष्कृतांना आहे, बहुजनांना आहे.

## विचित्र वास्तव

परंतु आज एक विचित्र दृश्य पाहायला मिळते. आजच्या रयतेला छळणारे आजचे नवे राजेसुद्धा जोरजोराने 'जय शिवाजी', 'जय शाहू' असे म्हणतात आणि आजच्या समाजातील तळचे बहुजन आणि रयतसुद्धा 'शिवाजी महाराज की जय', 'शाहू महाराज की जय' असे म्हणते. हा काय प्रकार आहे? छळणारेही तेच

म्हणतात आणि छळले जाणारेही तेच म्हणतात. हे काय चालले आहे? वरिष्ठ वर्णाचे समाजविभागही 'शाहू महाराज की जय' म्हणतात (ते तर अगदी जोरजोराने म्हणतात!) आणि कनिष्ठ वर्णाचे समाजविभागही तेच म्हणतात. हा प्रकार विचित्र वाटत नाही काय?

ज्यांच्या हितासाठी आजचे राज्य चालवले जाते ते समाजविभाग आणि लोकशाही असूनसुद्धा जे अजूनही वंचित राहिले आहेत, या दोघांनीही एकच विचार स्वीकारला आहे काय? त्यांचे हितसंबंध एक झाले आहेत काय? वरचे आणि तळचे हे भेद नाहीसे झाले आहेत काय? गरीब आणि श्रीमंत हे भेद संपले आहेत काय? वरच्या आणि खालच्या दोन्ही वर्गांना आणि दोन्ही वर्णांना एकदम एकाच वेळी शाहू महाराज इतके कसे काय प्रिय झाले आहेत? वरिष्ठ वर्गांना आणि वरिष्ठ वर्णांना शाहू महाराजांचा एकदम एवढा पुळका कसा काय आलाय?

वरवरचे आणि काहीसे किरकोळ बदल झाले असले, तरी वर्णभेद तर पूर्वी होते तसेच दिसताहेत. विषमता तर तशीच दिसते आहे. शाहू महाराज जाऊन आता पंचाहत्तर वर्षे होऊन गेली, तरी समाजात विद्येत मागासलेले आहेतच; निराश्रित आहेतच; मागासलेले आहेतच. दऱ्या-कपारींत राहणारे धनगर अजून तिथेच आहेत. आणि तरीसुद्धा सर्वच जण शाहू महाराजांचा जयजयकार करीत आहेत. हे असे कसे आहे? सर्व जण जयजयकार करताना दिसतात हे खरे आहे. परंतु खरा जयजयकार कोण करतो आणि बनेलपणाने जयजयकार कोण करतो? मनापासून नव्हे, अगदी बेंबीच्या देठापासून तळमळून जयजयकार कोण करतो आणि वरवरचा ओठापुरता जयजयकार कोण करतो?

ओठात एक आणि पोटात एक असे कोण करतो आहे काय, हे तपासले पाहिजे. समाजातील दोन्ही विभाग जयजयकार करतात, परंतु दोघांची भूमिका एक नाही. दोघांचा हेतूही एक नाही.

## 'जयजयकारा'चा उपयोग आणि दुरुपयोग

अजूनही गरीब बहुजन समाज विद्येत मागासलेला आहे. असा मागासलेला समाज मूर्तिपूजक असतो. अमूर्त विचारांआधारे व्यवहार करणे त्याला जमत नाही. त्याला व्यक्ती चांगली की वाईट हे समजू शकते, मात्र विचारांचे विश्लेषण करून त्यातील चांगलेवाईट ठरवणे त्याला अवघड जाते. तो जयजयकार करू शकतो आणि करतो. भक्तिभावाने आणि श्रद्धायुक्त अंत:करणाने थोर पुरुषांच्या प्रतिमांचे तो पूजन करतो. त्यांना देवासमान मानतो. अशा दीनदुबळ्या गरिबांचा आणि मागासलेल्यांचा जयजयकार मनापासूनचा आणि खरा असतो.

पण समाजात विद्येत पुढारलेले विभाग असतात. त्यांच्यापैकी काहींचे हितसंबंध बहुजन गरिबांच्या विरोधात असतात. कारण गरिबांना अंधारात ठेवून त्यांना फसवणे ही त्यांची गरज असते. त्यांची दिशाभूल करणे ही त्यांची गरज असते. विद्येत मागासलेल्यांच्या या प्रतिमापूजनाचा आणि 'जयजयकारा'चा ते धूर्तपणे आणि चलाखीने स्वत:च्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी उपयोग करून घेतात. मागासलेले गरीब ज्यांचा जयजयकार करतात, त्यांचाच जयजयकार हे धूर्त पुढारलेले श्रीमंत करू लागतात. ते तर अधिकच चांगल्या रितीने जयजयकार करतात. अधिक चांगल्या प्रतिमा करून अधिक चांगली प्रतिमा-पूजा करतात. त्यामुळे गरिबांना हे श्रीमंत आपले वाटतात. गरीब फसतात. श्रीमंतांचे साधते. मागासलेले फसतात आणि पुढारलेल्यांचे फावते.

जयजयकाराचे हे दोन प्रकार नीट लक्षात घेतले पाहिजेत. या दोन प्रकारच्या जयजयकारांचे दोन हेतू आहेत. हे हेतू एकमेकांच्या विरुद्ध आहेत. हे नीट समजून न घेता जयजयकार करणारे, सर्व जण एकच आहेत असे समजणे म्हणजे स्वत:ची फसवणूक करणे आहे.

## नुसता जयजयकार नको

थोर पुरुषांचा जयजयकार करावाच; महामानवांचे पुतळे आणि प्रतिमा उभाराव्यात; या प्रतिमांचे पूजनही करावे. जे चांगले आहे ते सतत डोळ्यांसमोर ठेवण्यासाठी त्याचा उपयोग होतो, नाही तर मग वाईट श्रीमंतांचे आणि गुंड-गुन्हेगारांचे पुतळे व प्रतिमा तेवढ्या नजरेसमोर राहतील आणि त्यांचेच फावेल.

परंतु नुसत्या प्रतिमापूजनाचा उपयोग मर्यादित आहे. अनेकदा हे पूजन मारक ठरते. फसवणुकीचे साधन ठरू शकते.

मी अनेक ठिकाणी डॉ. आंबेडकर जयंतीच्या व्याख्यानांसाठी जातो. काही ठिकाणी मी सभेत विचारतो, 'आंबेडकरांचे फोटो कुणाकुणाच्या घरात आहेत? त्यांनी हात वर करा.' बहुतेक सर्व जण हात वर करतात. मग मी विचारतो, 'आंबेडकरांची पुस्तके किंवा ग्रंथ कुणाकुणाच्या घरात आहेत? त्यांनी हात वर करा.' फारच थोडे हात वर होतात. न थांबता मी विचारतो, 'आंबेडकरांचे एक तरी पुस्तक संपूर्णपणे ज्यांनी वाचले असेल अशांनी हात वर करा.' संख्या आणखी कमी होते. माझ्या आजूबाजूस बसलेल्या व्यासपीठावरील नेत्यांकडे व संयोजकांकडे मी पाहतो. त्यांच्या चेहऱ्यावर अपराधीपणाची भावना स्पष्ट दिसते.

मुद्दा स्पष्ट होतो. प्रतिमांवर प्रेम करणे ठीक आहे, परंतु विचारांकडे दुर्लक्ष करणे

घातक आहे. शाहू महाराजांच्या बाबतीतही असेच घडते आहे.

आपण सर्व जण उत्सवप्रिय आहोत. आपल्याला मिरवणुका काढायला, गुलाल उधळायला, घोषणा द्यायला आवडते, नाचायला आवडते. हे स्वाभाविक आहे. उपयुक्तही आहे. परंतु तेवढेच करून थांबणे बरोबर नाही. उत्सवाच्या गदारोळात विचारांची घुसमट होणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. अशी दक्षता घेतली नाही तर बनेल श्रीमंत आणि फसवणारे आपणास गुलाल उधळायच्या कामात अडकवून ठेवतील आणि ते त्यांचे विचार पुढे रेटतील. त्यांचे विचार हेच बहुजनांच्या पूजनीय व्यक्तींचे विचार आहेत असे सांगत सुटतील. आपणास आपल्या पूजनीय व्यक्तींचे विचार माहीत नसतील तर मग आपण सहजच फसवले जाऊ. आपण फसवले जाऊ नये असे वाटत असेल तर आपल्या पूजनीय व्यक्तींच्या प्रतिमांबरोबरच त्यांच्या विचारांची ओळख व पारख आपणास पाहिजे.

म्हणून शाहू महाराजांचे काही विचार, काही व्यवहार आणि या व्यवहारांमागची भूमिका मांडत आहे. शाहू महाराजांचे अनेक विचार शाहू भक्तांपर्यंतही पोहोचलेले नाहीत. त्यांच्या व्यवहाराचा अर्थ त्यांच्या प्रतिमा आणि पुतळे पुजणाऱ्यांपर्यंतही गेलेला नाही. त्यांच्या व्यवहारासंबंधी अनेक गैरसमज आहेत. मुद्दाम पसरवलेले आहेत. त्यांचे विचार आणि त्यांच्या व्यवहाराचा अर्थ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचू देण्यात आलेला नाही.

अजूनही खरे शाहू महाराज पूर्णत्वाने बहुजन समाजापर्यंत पोहोचलेले नाहीत. म्हणून हा लेखनप्रपंच करीत आहे.

## शाहू राजांचे वारस कोण?

आज आपणास आणखी एक विचित्र स्थिती दिसते. सरकारी-निमसरकारी नोकऱ्यांत राखीव जागा ठेवण्यास विरोध करणारेसुद्धा शाहू राजांचा जयजयकार करतात आणि राखीव जागा असाव्यात असे म्हणणारेही जयजयकार करतात. गोरगरीब शेतकऱ्यांची कष्टाची शेती पिकावी म्हणून त्यांना धरणे बांधून, सवलती देऊन मदत करावी म्हणणारेही शाहूप्रतिमेचे पूजन करतात आणि ज्याचे त्याने पाहावे, सरकारने कुणालाही मदत वगैरे करू नये असे म्हणणारेही करतात. चातुर्वर्ण्याचा, सतीप्रथेचा, उच्च-नीचतेचा पुरस्कार करणारेही 'शाहू महाराज की जय' म्हणतात आणि त्याला विरोध करणारेही तेच करतात. कामगारांनी आपले संघ स्थापून भांडवलदारांच्या पिळणुकीस विरोध करावा अशा मुंबईच्या कामगारांसमोर भाषण करताना शाहू महाराजांनी जाहीरपणे व्यक्त केलेल्या विचारासारखे विचार स्वीकारून संघटना स्थापणारे व चालवणारेही शाहू उत्सवात

सहभागी होतात आणि कामगार संघटनांना विरोध करणारेही उत्सव करतात. बहुजनांना शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे असे सांगणाऱ्या शाहू महाराजांच्या विचाराप्रमाणे ती मागणी आजही करणारे शाहूभक्त आहेत आणि शिक्षणाचे खाजगीकरण करावे, शिक्षण ही शासनाची जबाबदारी नाही असे म्हणणारेही शाहूभक्त आहेत.

यांतले शाहू राजांचे खरे वारस कोण? आणि खोटे, मतलबी वारस कोण आहेत?

आजच्या अस्तित्वात असलेल्या राजकीय पक्षांच्या भाषेत बोलायचे, तर भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनासुद्धा शाहू महाराजांचे कौतुक करतात आणि दलितांच्या संघटनाही शाहूभक्ती करतात. काँग्रेस पक्षही शाहूभक्त म्हणवतो आणि कम्युनिस्ट, सोशॅलिस्टसुद्धा शाहूंचा वारसा पुढे घेऊन जाण्याची भाषा करतात. शाहू महाराज हे शूद्र आहेत म्हणून त्यांना वेदोक्त मंत्रांचा अधिकार नाही, असे म्हणणारे भट-भिक्षूक ब्राह्मणही शाहू महोत्सवात सहभागी होतात आणि वेदच टाकाऊ आहेत असे सांगणारेही शाहूश्रद्धा बाळगतात. स्वतःच्या व्यवहारांनी आणि विचारांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विषमता वाढवणारेही 'जय शाहू' म्हणतात. म्हणूनच शाहू महाराजांच्या विचारांच्या आधारे आणि त्यांच्या व्यवहारामागील भूमिकेच्या आधारे शाहू महाराजांचे खरे वारस कोण, हे तपासले पाहिजे.

❑❑❑

# कर्ते समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज

## राखीव जागांचा प्रश्न

भारताची राज्यघटना १९५० साली अमलात आली. त्यात मागास जाती-जमातींसाठी राखीव जागांची तरतूद केली. या राज्यघटनेत आर्थिक दृष्ट्या आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गासाठी राखीव जागांसंबंधी सूचना करून ठेवली होती. परंतु प्रत्यक्ष या व इतर मागासवर्गासाठी राखीव जागा ठेवायला भारतीय लोकशाहीला नंतरची चाळीस वर्षे लागली. मंडल आयोग आला. त्याच्या शिफारशी दीर्घकाळ बासनात गुंडाळून ठेवल्या गेल्या आणि १९९०च्या दशकात त्यांना कागदावर का असेना पण मान्यता मिळाली.

भारताची राज्यघटना आणि राखीव जागांच्या या कालक्रमाच्या तुलनेत शाहूराजांचे कार्य ठळकपणे लक्षात घेतले पाहिजे. शाहू महाराजांनी भारताची राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी अठ्ठेचाळीस वर्षे आणि आजपासून पंचाण्णव वर्षांपूर्वी २६ जुलै १९०२ रोजी आपल्या संस्थानात पन्नास टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या. भारतातील राखीव जागा ठेवणारा हा बहुधा पहिलाच कायदा असावा. या हुकमात शाहू महाराजांनी असे म्हटले आहे, "संस्थानाच्या नोकरीत मागासवर्गीयांचे प्रमाण कमी आहे. म्हणून ही परिस्थिती काही अंशी दूर करण्यासाठी व संस्थानामध्ये महाराजांच्या प्रजाजनांना उच्च शिक्षण संपादण्यास उत्तेजन देण्यासाठी या वर्गाकरिता आजपर्यंतच्या प्रमाणापेक्षा विस्तृत प्रमाणात संस्थानाच्या नोकरीत जागा राखून ठेवण्याचा महाराजांचा कृतनिश्चय झाला आहे.

"या धोरणाला अनुसरून या हुकमाच्या तारखेपासून ज्या जागा मोकळ्या पडतील त्यांपैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या वर्गातील उमेदवारांना देण्यात

येतील, अशी महाराजांची अनुज्ञा झाली आहे. ज्या ज्या ऑफिसात मागासलेल्या लोकांचे प्रमाण हल्ली शेकडा पन्नासपेक्षा कमी आहे; त्या त्या ऑफिसातील मोकळी पडणारी जागा झटपट मागासलेल्या वर्गातील इसमास देण्यात येईल.

"प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी या हुकमानंतर भरलेल्या जागांचा तिमाही अहवाल सादर केला पाहिजे."

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात या हुकमाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली आणि मागासवर्गीयांची प्रगती साधली. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकांतसुद्धा राखीव जागांना विरोध करणाऱ्यांनी शाहू महाराजांचे नाव घेऊन जय शाहू अशी घोषणा करण्यापूर्वी याच शतकाच्या दुसऱ्याच वर्षात म्हणजे १९०२ साली राखीव जागांची अंमलबजावणी सुरू केली होती हे लक्षात ठेवावे.

शाहूप्रतिमेचे पूजन करायचे पण शाहूविचारास विरोध करायचे धूर्त, मतलबी व बनवेगिरीचे या संदर्भातील एक उदाहरण सांगतो. महाराष्ट्र शासनाने शाहू छत्रपतींचे निवडक आदेश या शीर्षकाचे दोन खंड प्रकाशित केले आहेत. दोन्ही खंडांत मिळून सालवार अनुक्रमाने एकूण अठ्ठावन्न आदेश प्रसिद्ध केले आहेत. परंतु या दोन खंडांतील चारशे अठ्ठावन्न आदेशांत राखीव जागांचा आदेश समाविष्ट केलेला नाही. हे काय आहे? हे चुकून झाले असेल काय? शाहूभक्तांना शाहू महाराजांचा अतिमहत्त्वाचा हुकूमच समजू नये अशी तर कोणाची इच्छा नसेल का? कुणाचा तसा हेतू असो अगर नसो! धूर्तपणाचे हे कृत्य असो किंवा अनवधानाने घडलेली कृती असो! परिणाम एकच होतो. प्रतिमांचे पूजन आणि विचारांचे दफन.

## सनदी वकील

विद्यापीठाची पदवी नसलेल्या बहुजन समाजातील काही वकिलांना कोल्हापूर संस्थानात वकिली करण्याच्या सनदा महाराजांनी दिल्या होत्या. त्यांनी संस्थानी कारकिर्दीत आणि संस्थाने खालसा झाल्यानंतरही कोल्हापूरच्या कोर्टात वकिली केली. सर्वच नसले, तरी त्यांच्यापैकी काही जण बऱ्यापैकी वकील होते. विद्यापीठाच्या पदव्या घेतलेल्या काही वकिलांपेक्षाही बरे होते. ते कसेही असो! महाराजांचा हेतू स्पष्ट आहे. मागासांना प्रोत्साहन देणे हा तो हेतू होय. गुणवत्तेचा बागुलबुवा पुढे करून मागास समाजातील व्यक्तींची अवहेलना करणारे जेव्हा शाहू महाराजांचा जयजयकार करतात तेव्हा त्यांचे ढोंगीपण दिसून येते.

या अशा सनदांसंबंधी खुद्द शाहू महाराजांनी कसे समर्थन दिले आहे ते पाहण्यासारखे आहे. नागपूर येथे ३० मे १९२० रोजी झालेल्या अखिल भारतीय

बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्षपदावरून शाहू महाराज म्हणाले, "...इंग्रज सरकारने आरंभी शिक्षणाच्या बाबतीत कितीतरी कमी दर्जाच्या हिंदी लोकांस कलेक्टर, जज्ज वगैरेंसारख्या मोठ्या जागा देऊन राज्यकारभाराचे काम शिकवले... वकिलीच्या सनदाही परीक्षेशिवाय देण्यात येत असत... सनदा दिल्यामुळे कोणाही व्यक्तीस वकीलपत्र अमक्यासच दिले पाहिजे असे भाग पडत नाही... अशा सनदा देण्यात माझा हेतू इतकाच की अस्पृश्य वर्गास जे धंदे दडपशाहीने बंद झाले आहेत ते त्यांस मोकळे करून द्यावेत... त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा..."

## तर्कशुद्ध समर्थन

राखीव जागांचे अगदी तर्कशुद्ध समर्थन शाहू महाराजांनी १९०२च्या त्यांच्या हुकमानंतर दिले आहे. १५ एप्रिल १९२०च्या त्यांच्या नाशिक येथील भाषणात ते म्हणतात, "वयात आलेल्या व आपले हिताहित कळणाऱ्या मुलाकडे लक्ष देण्याची आईबापास जरुरी नसते. पण जे अज्ञानी आहेत, ज्यांना चालता येत नाही, ज्यांना धड उभेही राहता येत नाही त्यांची काळजी आईबापास जास्त घ्यावी लागते. कोणास हाताचा आधार द्यावा लागतो. कोणास उचलूनही घ्यावे लागते. असे करणारे आईबाप आपले कर्तव्य योग्य तऱ्हेने बजावतात असे होते. सर्व मुलांस सारखे वागवीत नसल्याने ते मुलामुलांत पक्षपात करतात असा आरोप त्यांच्यावर करणे, हे अधमपणाचे होईल. हेच तत्त्व लक्षात घेऊन, मी अगदी निकृष्ट स्थितीत असलेल्यांना जास्तीत जास्त उत्तेजन देत आहे. त्यांना नोकऱ्या सढळ हाताने दिल्या जात आहेत. व वकिलीच्या सनदाही त्यांना देऊन त्यांचे शिक्षण, दर्जा व महत्त्व वाढवण्यात येत आहे."

## तर्कशुद्ध समर्थन

शासनकर्ता हा आईबापासारखा असेल तर तो प्रजेपैकी दुबळ्या विभागाकडे खास लक्ष देतो आणि तो तसा नसेल तर ज्यांचे चांगले चालले आहे त्यांनाच अधिक देतो आणि जे दुबळे आहेत त्यांना अधिक दुर्बल करतो. पहिला समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने पावले टाकतो, तर दुसरा विषमता वाढवतो.

## दृष्टान्ताने समर्थन

भाई माधवराव बागलांनी महाराजांच्या काही उद्बोधक आठवणी सांगून ठेवल्या आहेत. राखीव जागांच्या समर्थनासंबंधीची ही आठवण मोठी चपखल आहे.

“महाराजांनी सत्ता हाती घेण्यापूर्वी नोकरीतील वरच्या जागा बहुतेक ब्राह्मणांनीच अडवल्या होत्या. महाराजांनी ते प्रमाण कमी केले. खास तज्ज्ञांची जरुरी असेल त्या ठिकाणी जात न पाहता योग्य माणसांची निवड केली. तरी याबद्दल ब्राह्मणी पत्रांनी खूप जळफळाट केला.

“सांगलीचे प्रसिद्ध वकील गणपतराव अभ्यंकर यांची व महाराजांची एकदा गाठ पडली असता ते महाराजांना म्हणाले, महाराज, जात पाहून स्कॉलरशिप व नोकऱ्या देता हे काही बरे नव्हे. लायकी पाहूनच त्या दिल्या पाहिजेत.

“महाराजांनी त्या वेळी काहीच उत्तर दिले नाही. अभ्यंकर महाराजांच्या रथातच होते. त्यांनी आपला रथ घोड्यांच्या पागेकडे नेला. चंदी देण्याचीच ती वेळ होती. नोकरांना चंदी आणायला सांगितली. हरभरे एका जाजमावर टाकले. त्याबरोबर हरभरे खाण्यासाठी सर्व घोडी धावत आली. जी दांडगी, ती अशक्तांना मागे सारून पुढे घुसली. शिंगरे व म्हातारी मागे राहिली, त्यांना काही चंदीच मिळाली नाही. हे अभ्यंकरांना दाखवून महाराज म्हणाले, पाहिलंत अभ्यंकर, जी तल्लख, सशक्त आणि लायक होती; त्यांनीच सर्व चंदी फस्त केली. लहान, रोगी व अशक्त उपाशीच राहिली. म्हणून मी चंदी तोबऱ्यात भरून त्यांना देतो. तसं चारलं नाही, तर त्यांना काहीच मिळणार नाही. मग मागासलेल्या व अस्पृश्य समाजाला पुढे आणण्याकरिता खास सवलती नकोत का द्यायला? अभ्यंकरांना काहीच बोलता आले नाही. ते म्हणाले, महाराज, तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे.”

या गोष्टीवर आणखी भाष्य करण्याची गरजच नाही.

## जातिभेद-जातिद्वेष-जातपरिषदा

राजर्षी शाहूंनी जातिभेद नाहीसे व्हावेत म्हणून केलेले कार्य प्रसिद्ध आहे. कायदे करून आणि मागासजातीला सर्वतोपरी मदत करून महाराजांनी हे कार्य केले. गंगाराम कांबळे या महार नागरिकास हॉटेल काढून दिले. ते स्वत: तिथे चहा पीत. कुणाचे काही काम असले की तिथे बोलावत आणि स्वत:बरोबर गंगारामच्या हातचा चहा पाजत. शिकारीस असताना धनगराच्या घरात जेवत. एकदा एका हरिजन स्त्रीने जवळपास पाणी नाही म्हणून स्पृश्यांच्या विहिरीतून घागर भरून पाणी काढले. स्पृश्यांनी ते पाहिले. त्यांनी तिला तसेच महाराजांपुढे सोनतळीस नेले. तक्रार केली. महाराज त्या स्त्रीला रागारागाने बोलू लागले, आवाज चढला, घाईघाईने बोलू लागले. बोलता बोलता ठसका लागला. “पाणी द्या! पाणी द्या!” म्हणून ओरडले आणि हरिजन स्त्रीच्या मडक्यातले पाणी प्याले. पाणी प्याल्यावर म्हणाले, “अरे बाबांनो! आता मीच महारणीच्या घागरीतले पाणी प्यालो. काय

करू?'' ठसका हे नाटक होते. महाराजांची ही कार्यपद्धती होती. महाराज तर्काने पटवण्याऐवजी व्यवहाराने पटवीत. विचारापेक्षा कृतीवर त्यांचा भर होता.

पण महाराज नीट विचार करीत. नीट मांडीतही. ते १९२० साली एका व्याख्यानात म्हणाले, ''जातिभेद असू द्यात पण जातिद्वेष मात्र नको असे म्हणणारे पुष्कळ आहेत. हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास त्यांच्या अज्ञानाची कीव केली पाहिजे. कारण जातिभेदाचे कारण जातिद्वेष हे आहे. तेव्हा कार्य नाहीसे करण्यास कारणही काढून टाकले पाहिजे.'' किती तर्कशुद्ध मांडणी आहे ही!

अर्थात जातिभेद तीव्र होऊ नयेत याची दक्षता घेण्याची गरजही त्यांना मान्य होती. मागासांना सवलती व सोयी देताना त्याच्या परिणामी जातिभेद तीव्र होऊ नयेत अशीच त्यांची भूमिका होती. जातिभेद हाच राजकारणाचा पाया करू पाहणाऱ्या तथाकथित शाहूभक्तांनी शाहू महाराजांचे खालील विचार नीट समजून घ्यावेत. शाहू महाराज म्हणाले होते, ''मी जाती परिषदांस उत्तेजन दिले तर जातिभेद तीव्र केल्याचे पाप माझ्या डोक्यावर येईल, अशी मला आज भीती वाटते.

''मागासलेल्या जातीला वर आणण्याचे प्रयत्न झाले नाहीत तर जातिभेदाचे कट्टर अभिमानी वीर तिला दडपून टाकल्याखेरीज राहणार नाहीत. यासाठी मागासलेल्यांचा कैवार घेणे हे जातिद्वेष वाढवणे नव्हे हे उघड आहे.'' तथापि ते असेही म्हणतात की, ''सर्व जातींच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दूरदृष्टी ठेवा. पायापुरतेच पाहू नका. जातिभेद मांडणे इष्ट आहे. जरूर आहे. जातिभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत ही जाणीव पक्की ध्यानात ठेवून मग त्या दिशेचा प्रयत्न म्हणून जाती परिषदा भरवा. परंतु जातिबंधने दृढ करणे, जातिभेद तीव्र होणे, हा परिणाम अशा परिषदांचा होऊ नये ही खबरदारी घेतली पाहिजे.''

'मागासलेल्यांचा कैवार घ्या, त्यासाठी खास प्रयत्न करा, त्यांना सवलती द्या, परंतु अंतिम उद्दिष्ट जाती नाहीशा करणे हे आहे. याकडे दुर्लक्ष करू नका. जाती परिषदा भरवून जातीच घट्ट होणार नाहीत याची दक्षता घ्या.' हा महाराजांचा सर्वंकष विचार आजही उपयुक्त आहे. मागासांचा कैवार घेण्याच्या नावाखाली जातिभेद घट्ट करण्याचे कार्य करू नका. ही महाराजांची शिकवण आज तर जास्तच आवश्यक वाटू लागली आहे.

❑❑❑

# तथाकथित 'गुन्हेगार' जमातीसंबंधी

छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांनी मागासलेल्या जाती-जमातींना व तथाकथित गुन्हेगार जमातींना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी काही खास व्यवहार केले. 'मणभर विचारापेक्षा कणभर कृती श्रेष्ठ ठरते' या उक्तीप्रमाणे त्यांनी कृतीवर भर दिला होता. विचारही मांडले, भाषणे केली, परंतु मुख्य म्हणजे कृती केली.

शाहू महाराज हे विचारवंत होते की कार्यकर्ते होते असा कुणी प्रश्न केला आणि दोन्हींपैकी एक सांगा असा आग्रह धरला तर शाहू महाराज म्हणजे एक कार्यकर्ता राजा होता, असेच म्हणावे लागेल. अर्थात चांगल्या विचारांखेरीज कुणीही टिकाऊ कार्यकर्ता होत नसतो आणि कार्याखेरीज नुसता विचार कितीही चांगला असला तरी तो वांझोटा असतो.

शाहू महाराजांनी फासेपारधी आणि तत्सम गुन्हेगार समजल्या गेलेल्या जमातींना जवळ केले. नोकऱ्या दिल्या, त्यांच्यातून अंगरक्षक नेमले, पहारेकरी नेमले, रथावर वाहक नेमले, त्यांना जमिनी दिल्या, घरे बांधून देऊन स्थायिक केले आणि प्रतिष्ठा दिली. मागास व तथाकथित गुन्हेगार जमातींना गावकामगारांकडे गावात दररोज हजेरी देण्याची पद्धत होती. महाराजांनी कायदा करून ही पद्धत रद्द केली. त्यांच्या परिणामासंबंधी माणगावच्या प्रसिद्ध परिषदेत ते म्हणाले होते, "हजेरी असल्यामुळे या गरीब लोकांवर गावकामगार व इतर ऑफिसर्सचा फार जुलूम होता. म्हणजे गावात बारा आणे मजुरीचा दर असला तरी गैरहजेरीची भीती घालून फुकट काम करून घेतात. हजेरीमुळे त्यांना आजार, पै-पाहुण्यांना भेटता येत नव्हते आणि कैक प्रसंगी भेट न होताच ते मरत असत." कळवळून महाराज पुढे म्हणाले, "मी प्रत्यक्ष असे पाहिले आहे की, कित्येक वेळा

लहान आजारी मुलांच्या आयांना व बापांना वेळी-अवेळी जबरदस्तीने वेठीस धरून नेल्यामुळे, ती लहान आजारी मुले त्यांच्याकडे लक्ष देण्यास कुणीच नसल्यामुळे त्यांचे आईबाप परत आल्यावर मेलेली सापडली आहेत. यापेक्षा जास्त जुलूम काय असायचा?''

मागासांसंबंधीचा हा अंतरीचा उमाळा आणि अंत:करण हेलावून टाकणारा कळवळाच शाहू राजांस अमर करीत आहे. इतर राजे इतिहासजमा झाले आणि हा पठ्ठ्या अजून जनमानसात खोलावर रुतून बसला, याचे हे कारण आहे.

याच भाषणात हजेरीमाफीचे परिणाम महाराजांनी सांगितले आहेत. ''गुन्ह्याचे प्रमाण पाहिले तर मी स्वत:च्या अनुभवावरून असे सांगू शकतो की, हजेरीच्या लोकांपेक्षा बिनहजेरीच्या लोकांतच गुन्हेगारांची संख्या जास्त आहे आणि मी हजेरी बंद केल्यापासून गुन्ह्यांची संख्या कमी झाली आहे. कारण प्रत्येकास अब्रूने जगावे असे वाटते.''

परंपरागत दुष्ट चातुर्वर्ण्याने ज्यांना माणूसपण नाकारले होते, त्यांच्यातला 'माणूस' जागा करून त्यांनाही अब्रूने जगावे असे वाटायला या राजाने शिकवले. किती थोर कार्य केले आहे महाराजांनी!

❑❑❑

# राजर्षी शाहू आणि स्त्रियांची स्थिती

शाहू महाराजांनी स्त्रियांना धार्मिक रूढी आणि परंपरा यांमुळे होणाऱ्या त्रासाची दखल घेऊन तो त्रास कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले होते.

स्वत:च्या सुनेला त्यांनी उच्च शिक्षण दिले. राजाराम कॉलेजात मुलींना फी माफ केली. स्त्री-शिक्षणास प्रोत्साहन दिले. परंतु यापेक्षाही महाराजांनी स्त्रिया आणि विवाह यांसंबंधी केलेले कायदे त्यांच्या पुरोगामी आणि कर्त्या समाजसुधारकत्वाची खरी खूण आहे.

## जोगत्या-मुरळ्या प्रतिबंधक कायदा

धर्माच्या नावाखाली देवादिकांना मुले-मुली वाहण्याची घृणास्पद पद्धत संस्थानात होती. या प्रकारातूनच अनेक अनैतिक गोष्टी घडत. धर्मालासुद्धा हिडीस स्वरूप येई. महाराजांनी जोगत्या-मुरळ्या प्रतिबंधक कायदा केला. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना जबर शिक्षेची तरतूद केली.

कायदा करूनही ही प्रथा बंद पडली नाही. पण तो वेगळा प्रश्न आहे. केवळ कायद्याने सामाजिक सुधारणा होत नाहीत, असा सर्व बाबतींत अनुभव आहे. परंतु महाराजांचा दृष्टिकोन काय होता हे यावरून दिसते.

## आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह कायदेशीर

विवाहविषयक प्रचलित रूढी आणि जुन्या धर्मांवर आधारित व इतर कायदे, यांमुळे स्त्रियांचे जीवन कष्टमय होते. अजूनही आहे. शाहू महाराजांनी १९२०च्या आगेमागे म्हणजे ७५ वर्षांपूर्वी केलेले कायदे पाहिले म्हणजे त्यांचे पुरोगामित्व अधिकच उजळून दिसते.

१९१७ साली वल्लभभाई पटेलांचे बंधू विठ्ठलभाई यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात एक कायदा मांडला होता. आंतरजातीय विवाहास कायद्याने मान्यता देणारा हा कायदा होता. धर्म आणि रूढी यांनी असे विवाह कायदेशीर मानले जात नव्हते. म्हणून अशा कायद्याची आवश्यकता होती. असे विवाह कायदेशीर मानले जात नसल्यामुळे संततीसंबंधी आणि इतर अनेक प्रश्न निर्माण होत. संबंध चालू राहत, संतती होत राही, परंतु त्यास कायद्याची मान्यता नसे. ती देण्यासाठी हा कायदा आणला होता.

पुरीचे शंकराचार्य आणि करवीर संस्थानातील धार्मिक नेते यांचा या कायद्याला विरोध होता. त्यांची भूमिका टाकाऊ असली तरी धर्माच्या नावाने ते ती भूमिका घेत होते, हे समजू शकते. परंतु तेव्हा पुढारी म्हणून ख्याती मिळवलेल्या लो. टिळकांचाही या 'पटेल बिला'स विरोध होता.

शाहू महाराजांनी या बिलास जोरदारपणे जाहीर पाठिंबा दिला. परंतु नुसता पाठिंबा दिला नाही; तर कोल्हापूर संस्थानात आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदाच केला.

## पुनर्विवाहासंबंधी कायदा

हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विधवेस विवाह करण्याचा हक्क नव्हता. न समजणाऱ्या अगदी लहान वयातही लग्ने होत. नवरा मेला की आयुष्य तसेच कंठावे लागे. शाहू महाराजांनी १९१७ साली आपल्या संस्थानात पुनर्विवाह नोंदणीसंबंधी कायदा केला आणि त्यामुळे कोल्हापूर संस्थानात पुनर्विवाह करणे कायदेशीर ठरले. पुनर्विवाह विधिपूर्वक करावेत अशीही योजना केली.

## काडीमोडीसंबंधी कायदा

संस्थानातील अनेक समाजविभागांत घटस्फोटासंबंधी (काडीमोडीसंबंधी) जात-पंचायतीचे कायदे होते आणि त्याप्रमाणे व्यवहार चालत असत. जात-पंचायतींचे हे कायदे पुरुषांना अनुकूल आणि स्त्रियांना प्रतिकूल असत. शिवाय जात-पंचायतीवर कुणाचेच आणि कशाचेच बंधन नव्हते. अनेक वेळा जात-पंचायती तोंड पाहून निर्णय देत असत. एकाच बाबीसंबंधी ते वेगवेगळ्या वेळी वेगवेगळा निर्णय देत आणि त्याविरुद्ध दाद मागायलाही जागा नसे.

महाराजांनी जातिप्रथेप्रमाणे काडीमोड घेण्यासंबंधीही कायदा केला. नियमांत सुसूत्रता आणली. पक्षपात बंद केला आणि काही कारणांसाठी स्त्रियांनासुद्धा काडीमोडीसाठी परवानगी दिली. सर्व कामे कोर्टात चालवण्याचा निर्णय केला

आणि कोर्टासाठी कायदा केला.

हे कायदे करताना महाराजांनी तज्ज्ञांचा सल्ला घेतला होता. मुंबई हायकोर्टाचे एक निवृत्त न्यायाधीश आणि मद्रास हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या सल्ल्याने हे नियम केले होते. धोरण महाराजांचे परंतु सल्ला तज्ज्ञांचा अशा मिलाफाने हे कायदे केले होते.

## स्त्रियांना क्रूरपणे वागवणे

स्त्रियांसंबंधी महाराजांनी एक वैशिष्ट्यपूर्ण आणि अपूर्व कायदा केला होता.

या कायद्याच्या प्रास्ताविकात म्हटले आहे, "हिंदुस्थानातील लोकांचे जे निरनिराळे समाज आहेत, त्यांच्या शास्त्रकारांनी हिंदू कुटुंबांच्या पुढाऱ्यांना, काही प्रसंगी स्त्रियांना हलकेसे शासन करण्याची परवानगी दिलेली आहे. परंतु त्या परवानगीचा दुरुपयोग होऊन स्त्रियांना वाटेल तशा वाईट रितीने वागवणाऱ्या आपणाला सनातन काळाचा परवानाच मिळाला आहे अशी पुरुषांची समजूत झालेली दिसते. याकरिता स्त्रियांना होत असलेल्या जाचाचे हे प्रकार इंडियन पिनल कोडच्या मर्यादेत येऊ शकत नाहीत. अशा प्रकारच्या जाचांपासून होणाऱ्या दुष्परिणामांस आळा घालावा म्हणून हे नियम करणे योग्य व आवश्यक असल्याचे दिसून आले आहे."

ज्या हेतूने हा कायदा करण्यात आला होता तो हेतू स्पष्ट आहे. या कायद्यात क्रूरपणाची वागणूक या शब्दाची बरीच व्यापक व्याख्या केलेली आहे. शारीरिक छळाबरोबरच मानसिक छळाचा समावेश त्यात आहे. उपाशी ठेवणे, सतत उभे करणे, आपल्या स्त्रीचा सहवास टाळणे, मुद्दाम अवहेलना करणे याही गोष्टी त्यात आहेत.

या कायद्याने स्त्रियांचे छळ थांबले नाहीत हे खरे, परंतु त्यांना आधार निश्चित मिळाला. एका बाजूने स्त्रियांना शिक्षण देणे, आणखी एका बाजूने सामाजिक जाणीव तयार करून स्त्री-पुरुष समानतेची भावना रुजवणे आणि आणखी एका बाजूने सामाजिक सुधारणेचे कायदे करणे, हेच करावे लागते. परिणाम मर्यादित झाले असले तरी राजर्षी शाहूंचा दृष्टिकोन मात्र अगदी स्पष्ट आहे.

❑❑❑

# राजर्षी शाहू : शिक्षणविषयक भूमिका व कार्य

ज्या समाजात शिक्षणाचा फारसा वारसा नव्हता आणि परंपरांनी ज्यांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता; अशा सामाजविभागांचे महाराष्ट्रातले विद्येचे माहेरघर जर कोणते असेल, तर ते कोल्हापूर आणि माहेरघराचा पाया घालंणारा दूरदृष्टीचा महापुरुष जर कोण असेल तर तो म्हणजे शाहू राजा.

ब्राह्मणेतरांच्या शिक्षित झालेल्या असंख्य नेत्यांनी कोल्हापुरात शिक्षण घेतले आहे आणि हे आपसूक किंवा आपोआप घडलेले नाही. यामागे शाहू महाराजांची भूमिका आणि त्यांचा व्यवहार आहे.

शिक्षणक्षेत्रात कोल्हापूरने बजावलेली कामगिरी आता सर्वमान्य झाली आहे. शाहू महाराजांचे या क्षेत्रातील योगदानही मान्यता पावले आहे. परंतु शिक्षणविषयक शाहू राजांच्या भूमिकेचे वेगळेपण म्हणावे तसे पुढे येत नाही. आजच्या संदर्भातसुद्धा त्यांची ही भूमिका आवश्यक आहे हे नीट लक्षात घ्यायला हवे.

## सक्तीचे मोफत शिक्षण

आपला देश १९४७ साली स्वतंत्र झाला. आपली प्रजासत्ताकाची घटना १९५० साली अमलात आली. घटनेच्या ४५व्या कलमाने असा संदेश दिला आहे की, दहा वर्षांत चौदा वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले पाहिजे. आता स्वराज्याची पन्नास वर्षे आणि घटनेची जरा कमी वर्षे पूर्ण होऊन गेली आणि आता आपणास सांगण्यात येते आहे की, लवकरच 'जगातील सर्वात जास्त निरक्षरांचा देश' अशी आपली ख्याती जगप्रसिद्ध होईल.

आता तर शिक्षण ही शासनाची जबाबदारी आहे की नाही अशी चर्चा सुरू

आहे. काहींची तर इतपत मजल गेली आहे की ते असे म्हणतात, 'सर्वांनी शिकलेच पाहिजे अशी काय गरज आहे. थोडे लोक शिकले तरी देशाचे भागू शकेल.'

शाहू महाराजांनी त्यांच्या राज्यात १९१७ साली सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. राखीव जागांसंबंधी १९०२ साली केलेला कायदा तेव्हा जसा दुर्मीळ तसाच सक्तीचा आणि मोफत शिक्षणाचा १९१७ सालचा शाहू महाराजांचा कायदाही दुर्मीळच होता.

## प्राथमिक शिक्षणावर भर

शाहू महाराजांचा भर प्राथमिक शिक्षणावर होता. त्यांची प्राथमिक शिक्षणाची तळमळ एका भाषणात व्यक्त झाली आहे. ते म्हणाले होते,

"शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाळ म्हटले म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्यांच्या मागून आलेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले आणि खालच्या कमी जातींच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांना स्वत:चे धर्मग्रंथ आणि वेदसुद्धा वाचण्याची मनाई होती. हिंदू धर्माशिवाय इतर कोणत्याही धर्माने अशा आंधळ्या व दु:खकारक परिणाम करण्याबद्दल अग्रेसरत्व मिळवले नाही."

शिक्षणातील अडचणीचे पेशवाईतील उदाहरण देताना शाहू महाराजांनी सांगितले की, "श्री प्रतापसिंह महाराज छत्रपती (सातारा) हे पेशव्यांचे ताब्यात असताना लहानपणी लिहिणे-वाचणे शिकण्याचीही त्यांना बंदी होती. तेव्हा त्यांच्या पूज्य धोरणी आईने त्यांस रात्री बारा वाजता उठवून ब्राह्मणेतर पंतोजीकडून लिहिणे-वाचणे शिकवण्याचे काम केले." पेशवाईत खुद्द छत्रपतींना चोरून मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत होते मग इतरांची काय कथा!

शिक्षणासंबंधी अशा परंपरा असताना महाराजांनी शिक्षणास महत्त्व दिले हे लक्षात ठेवले पाहिजे. सर्व प्रकारच्या शिक्षणाची गरज मान्य करून हा अग्रक्रम कशास असावा हे एके ठिकाणी महाराजांनी मांडले आहे. ते म्हणाले, "प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याअगोदर सध्या उपयोगात असलेली शाळागृहे विस्तृत व

हवेशीर केली पाहिजेत व तिकडे खर्च करण्याची जास्त जरुरी आहे, हे 'केसरी'चे प्रतिपादन कोणाही सरळ बुद्धीच्या माणसास चीड आणील. No Cake to a few untill all are served with bread हे इंग्लंडातील मजूर पक्षाचे धोरण आहे. पण येथे शेकडा नव्वद लोक उपाशी आहेत व दहा लोक पोळी खात आहेत. उपाशी लोकांना कोंड्याच्या भाकरीचीही सोय करण्याअगोदर या दहांच्या पोळीवर साजूक तूप वाढा असा ओरडा करणाऱ्यांना रयतेची कळकळ कितपत आहे हे उघड आहे.'' सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करताना महाराजांनी पालकांना दंड ठेवला. यादी करून, ती जाहीर करून, नोटीस पाठवूनही मुलगा शाळेत आला नाही तर दरमहा एक रुपया दंड मुलगा शाळेत येईपर्यंत केला जाईल असा कायदा होता. १९२० च्या सुमारास काही ब्राह्मण पुढारी आय. सी. एस.ची परीक्षा भारतात व्हावी म्हणून प्रयत्न करीत होते. तेव्हा ही परीक्षा इंग्लंडमध्ये होत असे. त्यांच्या प्रयत्नासंबंधी महाराज म्हणतात, ''आय. सी. एस.च्या खटपटीला आणि कॉलेज स्थापन करायला मात्र पैसा भरपूर मिळतो पण प्राथमिक शिक्षणास मात्र या लोकांजवळ पैसा नाही का? त्याच्या योगे ब्राह्मणेतरांस फायदा झाला असता हेच त्यातील इंगीत होय.'' कोल्हापुरात उच्च शिक्षणाच्याही सोयीची दखल महाराजांनी घेतली होती. हायस्कूल व कॉलेजही काढले, परंतु भर प्राथमिक शिक्षणावर होता. यावरून हा राजा प्रजेच्या कोणत्या विभागाची काळजी घेत होता हे स्पष्ट आहे.

आजचे लोकशाहीतील राज्यंकर्ते मात्र प्राथमिक शिक्षणाची अक्षम्य हेळसांड करीत आहेत हे सर्वांना दिसतेच आहे. राज्यकर्ते काय बोलतात आणि काय भाषणे करतात, यावरून त्यांची बांधिलकी समजत नसते. ते समाजाच्या कोणत्या विभागासाठी प्रत्यक्ष काम करतात; यावरून त्यांची समाजाच्या कोणत्या विभागाशी बांधिलकी आहे हे स्पष्ट होते. 'तळागाळातल्यांच्या' शिक्षणाची भाषणे करायची आणि खेड्यापाड्यांतल्या शाळा बंद करायच्या हे धोरण काय सांगते? 'निकाल कमी लागला तर शाळा बंद' करण्याचे धोरण काय दर्शवते? 'हजेरी कमी असेल तर शाळा बंद' हे धोरण काय सांगते? या धोरणाने कुणाच्या शाळा बंद पडतील? कुठल्या शाळा बंद पडतील? गरिबांच्या शाळा बंद पाडण्याचे हे धोरण, खेड्यातील शाळा बंद पाडण्याचे हे धोरण बहुजनविरोधी आहे. शाहू महाराजांच्या धोरणाविरोधी आहे. म्हणूनच हे धोरण घेणारे फक्त शाहूंचा जयजयकार करतात आणि व्यवहार उलटा करतात. त्यांच्या जयजयकाराने आणि प्रतिमापूजनाने फसू नये. आपण शाहू राजा नीट समजावून घ्यावा.

## दलितांना शिक्षण

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी मागासलेल्या जातींच्या आणि मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणाची खास काळजी घेतलेली दिसते. परंपरेचे गुलाम बनलेले संस्थानातील काही शिक्षक महार-मांगांच्या मुलांना शाळेच्या व्हरांड्यात बसवत, इतर मुले आत बसवत. मग शिक्षण देत. महाराजांच्या हे लक्षात आल्यानंतर अशा शिक्षकांना जरब बसेल असा हुकूम महाराजांनी काढला. ८ ऑक्टोबर १९१९ रोजी शाहू महाराजांनी खास हुकूम काढला. त्यात म्हटले आहे, "करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा आहेत. त्या येत्या दसऱ्यापासून बंद कराव्यात व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांत इतर मुलांप्रमाणेच दाखल करून घेत जावे. सरकारी शाळांतून शिवाशीव पाळण्याची रीत नसल्याने सर्व जातींच्या व धर्मांच्या मुलांस एकत्र बसवण्यात यावे."

दुसरा हुकूम तर अधिक सणसणीत व अधिक जरब बसवणारा, स्पष्ट आहे. तो असा,

"हुजुराची अंत:करणपूर्वक इच्छा आहे की शाळा खात्यातील ज्या खाजगी किंवा सरकारी संस्थांना ग्रँट किंवा इमारती किंवा प्ले ग्राउंड वगैरे रूपाने मदत मिळते त्यांनी स्पृश्यवर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे, कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणास आपला मार्ग काढू शकतात. परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. शाळा खात्यातील कोणाही इसमाची असे करण्यास हरकत असेल तर त्याने हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्यांचे आत आपला राजीनामा पाठवावा. अर्थात त्याला पेन्शन मिळणार नाही. मदत मिळणाऱ्या शिक्षणसंस्थेची हरकत असेल तर त्याचीही ग्रँट किंवा इतर मदत दरबार बंद करील." यावर भाष्य करण्याची गरजच नाही.

दलित समाजातील मुलांना संस्थानात प्रोत्साहनपर आणि आवश्यक म्हणून स्कॉलरशिप्स दिल्या जात व सवलती मिळत. राजाराम कॉलेजमध्ये महाराजांच्या काळात मुलींना फी माफ होती. धंदे-शिक्षणावर भर द्यावा आणि शेतकऱ्यांच्या मुलांसाठीच्या शाळांच्या वेळा त्यांच्या सोयीने ठेवाव्या, असे आदेश महाराजांनी दिले आहेत.

## वसतिगृहे

वसतिगृहांच्या बाबतीत महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण भारतात कोल्हापूरचे स्थान अद्वितीय ठरेल. अक्षरश: असंख्य वसतिगृहे कोल्हापुरात आहेत. यांतील

बहुतेक वसतिगृहे शाहू महाराजांच्या काळातील आहेत. यांतली अनेक वसतिगृहे जातवार आहेत. काही सर्व जातींचीही होती व आहेत. वसतिगृहांवर भर आणि त्यासाठी खर्च म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर खर्च, ही बाब स्पष्ट आहे. खेड्यातील मुलांना शहरात येऊन चांगले व वरचे शिक्षण घेता यावे म्हणून त्या त्या समाजाला महाराजांनी प्रोत्साहन दिले. वसतिगृहांसाठी जागा दिल्या. बहुतेक वसतिगृहांना कायम उत्पन्न मिळावे म्हणून शेती व इतर सोयी करून दिल्या.

शाहू महाराजांनी एके ठिकाणी कोल्हापुराचा उल्लेख वसतिगृहाची जननी असा केला आहे तो रास्तच आहे. या वसतिगृहांचाच लाभ घेऊन संस्थानाबाहेरील आणि स्वातंत्र्यानंतरही दूरदूरचे विद्यार्थी कोल्हापुरात येऊन शिकले. ही वसतिगृहे नसती तर जे शिकू शकले नसते असे बहुजन समाजातील सुशिक्षित महाराष्ट्रात असंख्य आहेत.

आज शिक्षणास बंदी घालणारी जुनी परंपरा मोडली गेली आहे, परंतु नवी बंदी येते आहे. शिक्षणाचे खाजगीकरण याचा अर्थ स्पष्ट आहे. ज्याला शक्य असेल त्याने, परवडेल त्याने शिकावे, इतरांनी घरात बसावे. उच्च शिक्षणाचे सोडाच, आता मॉंटेसरीत प्रवेश मिळवायलाही देणग्या द्याव्या लागतात.

हे सारे शाहू महाराजांच्या शैक्षणिक भूमिकेच्या विरोधी आहे आणि हे करणारे शाहू महाराजांचा जयजयकार करतात.

❑❑❑



124266

# स्वातंत्र्य आंदोलन आणि शाहू महाराज

शाहू महाराजांच्या काही भूमिकांसंबंधी काही अपसमज आहेत. स्वातंत्र्य आंदोलनासंबंधी शाहू महाराजांच्या भूमिकेबाबत हे घडले आहे व घडते आहे.

कुणाही व्यक्तीचे किंवा तिच्या कार्याचे किंवा एखाद्या घटनेचे यथायोग्य मूल्यमापन करताना त्या व्यक्तीचा किंवा त्या घटनेचा किंवा त्या व्यक्तीच्या विचारांचा व उद्‍गारांचा काळ लक्षात घेतला पाहिजे. काळ जसा लक्षात घेतला पाहिजे तसा त्या व्यक्तीचा परिसर विचारात घेतला पाहिजे. त्या व्यक्तीचे त्या विशिष्ट काळी असलेले स्थान लक्षात घेतले पाहिजे. स्थल-कालसापेक्ष व्यक्ति-स्थान-सापेक्ष असे मोजमाप केले पाहिजे. त्याचप्रमाणे एकूण सर्व घटना आणि सर्व विचार एकत्रित लक्षात घेऊन मूल्यमापन केले पाहिजे. मूल्यमापनाच्या या पद्धतीकडे दुर्लक्ष केले तर मूल्यमापन विकृत होते.

शाहू महाराजांचा स्वातंत्र्यविषयक दृष्टिकोन तपासताना अनेकांचे हे भान सुटलेले दिसते. शाहू महाराजांनी १८९४ साली राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली आणि १९२२ साली २८ वर्षे राज्यकारभार करून ते निधन पावले.

१८९४ ते १९२२ या काळात भारतातील स्वातंत्र्य आंदोलनाची अवस्था काय होती? भारतीय जननेत्यांची स्वराज्यविषयक मागणी काय होती? शाहू महाराजांच्या निधनानंतरच्या काळात स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ आणि सर्वमान्य नेत्यांची शाहू महाराजांच्या कालखंडात भूमिका काय होती? राजकीय नेत्यांच्या भूमिका काय होत्या? हे तपासायला हवे आणि तसेच सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणाऱ्यांच्या भूमिका काय होत्या हेसुद्धा तपासायला पाहिजे.

१८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली होती. सोयी, सवलती मागणे

आणि ठराव करणे हे राष्ट्रीय काँग्रेस करू लागली. काँग्रेसच्या अधिवेशनात आणि बैठकीत त्या सुरुवातीच्या काळात इंग्लंडच्या राजाची स्तुतीपर प्रार्थना म्हटली जात होती.

शाहू महाराजांच्या निधनापर्यंत म. गांधी हे 'महात्मा' व्हायचे होते. त्यांना राष्ट्रपिता आणि महात्मा या रास्त बिरुदावली मिळावयाच्या होत्या. 'यंग इंडिया'च्या ३ जानेवारी १९२२च्या अंकात म. गांधींनी लिहिले होते, ''आपण पूर्ण स्वातंत्र्याचा आग्रह धरणे ही गोष्ट धार्मिक दृष्ट्याही बेकायदेशीर होईल. तसे करणे द्वेषमूलक व चुकीचे ठरेल. त्यामुळे ईश्वराचे अस्तित्व नाकारण्यासारखे होईल...''

भारतीय स्वातंत्र्याचे दुसरे आणि सर्वमान्य नेते पं. जवाहरलाल नेहरू यांनी १९२१ साली संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाशी आपले नाव जोडायला नकार दिला होता. १९२१च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अहमदाबाद अधिवेशनात हजरत मोहानी यांनी एक ठराव मांडून 'संपूर्ण स्वातंत्र्य हे आपले ध्येय आहे' असे जाहीर करावे, अशी मागणी केली होती. या ठरावात सहभागी व्हायला पं. नेहरूंनी नकार दिला होता आणि म. गांधींनीही विरोध केला होता. १९२१ सालच्या म. गांधी किंवा पं. नेहरू यांच्या भूमिकेमुळे ते 'स्वराज्यद्रोही' ठरत नाहीत. याच नेत्यांनी पुढे स्वातंत्र्य चळवळीचे धुरीणत्व केले.

संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव राष्ट्रीय काँग्रेसने १९२९ साली म्हणजे शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर ७ वर्षांनी केला. काळ हा असा होता.

## ब्रिटिशांचे मांडलिक-संस्थानिक शाहू राजे

टिळक-गांधी-नेहरू आणि शाहू महाराज यांच्या स्थानांत गुणात्मक फरक होता. शाहू महाराज एक संस्थानिक होते. ब्रिटिशांचा मांडलिक होते. ब्रिटिशांचा पोलिटिकल एजंट त्यांच्या कार्यावर व कारभारावर करडी नजर ठेवून होता. शाहू महाराजांच्या अगोदरचे कोल्हापूरचे संस्थानिक राजे यांना खूप मोठ्या छळाला आणि मरणाप्राय यातनांना सामोरे जावे लागले होते. स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी व्हायला किंवा त्या कार्यास मदत करायला अनुकूल असावे, अशी काही ही अवस्था नव्हती.

शाहू महाराजांची स्वत:ची स्थिती अशी होती. 'राजकीय स्वातंत्र्य आधी की सामाजिक समता आधी' असा राजकीय की सामाजिक असा वाद महाराष्ट्रात शाहू महाराजांच्या काळात आणि नंतरही चालू होता आणि सामाजिक समतेसाठी, सामाजिक सुधारणांसाठी प्रयत्न करून विचार व कार्य करणारे मोठमोठे मान्यवर

नेते सामाजिक सुधारणांचा अग्रक्रम आग्रहाने मांडत होते. ब्रिटिशांचे राज्य भारतावर आले हे भारताचे भाग्य आहे. भारताच्या उद्धारासाठी ब्रिटिशांची योजना परमेश्वराने केली आहे, असे सांगणारे सुशिक्षित विद्वान, मोठमोठे नेते त्या काळी कार्यरत होते.

सामाजिक सुधारकांचा परिसर हा असा होता. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांची स्वराज्यविषयक भूमिका तपासली पाहिजे.

## महाराजांची भूमिका

शाहू महाराजांनी अनेक वेळा आपल्या भाषणांमधून त्यांची स्वराज्यविषयक भूमिका स्पष्ट केली आहे. महाराजांच्या स्वत:च्या अधिकृत भाषणांतील खालील उताऱ्यांवरून त्यांची भूमिका स्पष्ट समजते.

"स्वराज्य हवे अशी ओरड चोहीकडे ऐकू येत आहे. आम्ही स्वराज्यास पात्र आहोत की नाहीत हाच एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्वराज्य आम्हास पाहिजे आहेच."

"जोपर्यंत हिंदुस्थान जातिबंधनात निगडित राहील, तोपर्यंत स्वराज्य संस्थेपासून मिळणारे सर्व फायदे त्यास घेता येणार नाहीत."

"येथील सत्ता उच्चवर्गाच्या हाती जाईल."

"आमच्यातील अंत:स्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हाला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक जातिपद्धती झुगारून देणे आम्हाला अत्यंत आवश्यक आहे."

"जर हल्लीची जातिव्यवस्थाच कायम राहिली, तर ज्या रितीने हल्ली सुराज्याचा अर्थ समजला जातो ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हे होय. याचा अर्थ मी स्वराज्याच्या चळवळीच्या विरुद्ध आहे असे समजावयाचे नाही. हे पुन्हा एकवार सांगतो. आम्हाला स्वराज्य पाहिजेच."

"केवळ अल्पसंख्य उच्चवर्णीयांच्या हातातच सत्ता जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये."

वरील सर्व उतारे खामगाव येथे भरलेल्या 'अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदे'च्या अकराव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून २० डिसेंबर १९१७ रोजी केलेल्या भाषणातून घेतलेले आहेत. या परिषदेला मि. स्टँडन हे ब्रिटिश अधिकारी हजर होते.

वरील अवतरणांतून महाराजांची भूमिका स्पष्ट होते. "आम्हाला स्वराज्य पाहिजेच" असे ते पुन्हा पुन्हा सांगतात. स्वराज्य हे मूठभर उच्च वर्गाच्या हातात

जाईल अशी भीती ते व्यक्त करतात. स्वराज्यासाठी आपण अगोदर पात्र झाले पाहिजे आणि त्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे, जातिभेद गाडले पाहिजेत आणि अंत:स्थ कलह नाहीसे केले पाहिजेत, असे त्यांचे मत होते.

१५ एप्रिल १९२० रोजी नाशिक येथे केलेल्या भाषणात महाराजांनी 'सामाजिक की राजकीय' या विषयासंबंधी आपले विचार स्पष्टपणे मांडले आहेत.

'आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा' हा वाद समंजसपणाचा नाही. या सुधारणा स्वतंत्र नाहीत. एकात एक गुंतलेल्या आहेत. जणू काही या दोन सुधारणा राष्ट्रोन्नतीच्या गाड्याची दोन चाकेच आहेत. एका चाकाचा गाडा सुरक्षित नेणे शहाणपणाचे होईल काय? महाराजांची भूमिका स्पष्ट आहे. 'आधी' काय हा वाद असमंजस आहे. दोन्ही एकदम हवे. यात एक गोष्ट स्पष्टपणे अभिप्रेत आहे. आधी राजकीय आणि ते साध्य झाल्यानंतर सामाजिक, ही भूमिका त्यांना मान्य नाही. तसेच आधी सामाजिक आणि नंतर राजकीय ही भूमिकाही त्यांना मान्य नाही. दोन्ही एकाच वेळी, एकाच गाडीच्या दोन चाकांप्रमाणे अशी त्यांची भूमिका आहे.

❑❑❑

# वेदोक्त प्रकरणाची सामाजिक फलश्रुती

सालीना तीस हजार रुपयांचे वार्षिक इनाम असणाऱ्या शाहू महाराजांच्या पुजाऱ्याने महाराज हे शूद्र आहेत म्हणून त्यांना वेद मंत्राने विधी करण्याचा अधिकार नाही, अशी भूमिका घेतली. भटजी राजोपाध्ये यांच्या या भूमिकेमुळे महाराज दुखावले गेले. त्यांनी त्यांचे इनाम जप्त केले. हा वाद बराच चिघळला. शेवटी महाराजांचा वेदोक्ताचा अधिकार प्रस्थापित झाला. या प्रकरणाच्या तपशिलात जाण्याची आता गरज उरलेली नाही, परंतु त्याच्या सामाजिक चळवळीवरील परिणामांची मात्र दखल घेतली पाहिजे.

"वेदोक्तामध्ये मला काहीच अर्थ दिसत नाही. केवळ ब्राह्मण विरुद्ध जातात म्हणून हा हक्क आम्ही मागतो" असे भास्करराव जाधव म्हणाले होते. बुद्धिवादी भूमिकेतून पाहता त्यांची ही भूमिका बरोबरच आहे.

मंत्र वेदातील म्हंटले काय आणि पुराणातील म्हटले काय किंवा आणखी कशातील म्हटले काय, त्याने काहीच निर्माण होत नाही. मंत्राने काहीतरी घडेल अशी मानवाच्या अप्रगत अवस्थेत समजूत होती. मंत्राने जसे काही मिळत नाही तसेच त्याचा इतरही काही उपयोग नाही; उलट मंत्र-तंत्रावर भर दिला गेल्याने न्याय, नीती, समता या नीतितत्त्वांकडेही दुर्लक्ष होते आणि प्रगतीस अडथळाच होतो.

हे सारे खरे आहे. परंतु दक्षिणा घेणाऱ्या भटभिक्षुकांनी स्वत:स मोठे समजून शाहू महाराजांना शूद्र ठरवू पाहिले, म्हणून महाराजांनी वेदोक्ताच्या अधिकाराचा आग्रह धरला. वेदोक्ताचा हा आग्रह म. फुले आणि सत्यशोधक समाजाच्या भूमिकेच्याही विरुद्ध आहे. परंतु एका विशिष्ट वातावरणात आणि अवस्थेत हे प्रकरण महाराजांना लावून धरावे लागले.

शिवाजी महाराजांनासुद्धा शूद्र म्हणून राज्याभिषेक करण्यास महाराष्ट्रातील सर्व ब्राह्मणांनी नकारच दिला होता. शेवटी काशीवरून गागाभट्टास आणवून राज्याभिषेक केला होता.

वेदोक्ताच्या महाराजांच्या आग्रहाकडे लक्ष देऊन ब्राह्मणांच्या उच्चतेच्या दुर्गंधीयुक्त दर्पाकडे दुर्लक्ष करता येत नाही आणि करू नये.

## लो. टिळकांच्या मर्यादा

वेदोक्ताच्या प्रकरणात महाराजांचे ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध भांडण होते. जसे एकदा भांडण पेटले की एक टोक गाठले जाते तसे घडले. शाहू महाराजांचे भांडण योग्य होते. न्याय त्यांच्या बाजूने होता. शेवटी त्यांनी न्याय मिळवलाही. परंतु यात लोकमान्य टिळक उतरले. त्यांनी राजकीय नेत्यासारखे वर्तन न करता ब्राह्मण जातीच्या नेत्यासारखे वर्तन केले. आपण स्वत: ब्राह्मण असल्याच्या आणि पुणेरी ब्राह्मण अनुयायांच्या गैरदडपणाच्या अशा दोन्ही मर्यादा लो. टिळकांनी ओलांडल्या नाहीत. 'तेल्या-तांबोळ्यांचे' पुढारी म्हणून लो. टिळकांना काही लोकांनी संबोधले होते. या प्रकरणात मात्र लो. टिळकांनी ब्राह्मणांच्या पुढाऱ्यासारखे वर्तन केले आणि त्यामुळे महाराष्ट्राचे नुकसान झाले. इतरही अनेक बाबतींत लो. टिळकांचे सामाजिक प्रश्नांसंबंधीचे धोरण व व्यवहार प्रतिगामी होते.

## महाराजांच्या मर्यादा

या वेदोक्त प्रकरणाच्या परिणामी लो. टिळक जसे उघडे पडले, तशी दुसरी एक गोष्ट घडली. म. फुले आणि सत्यशोधक समाजाच्या प्रेरणांना आणि कार्यास शाहू महाराजांनी सतत मदत केली. त्या कार्याचा, म. फुल्यांचा, त्यांच्या प्रेरणांचा महाराजांनी सतत पुरस्कार केला; परंतु या वेदोक्त प्रकरणात म. फुल्यांच्या प्रेरणांचा आणि त्यांच्या शिकवणुकीचाही अभावितपणे पराभव झाला. महाराजांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या.

महाराजांनी वेदोक्ताचा अधिकार प्राप्त करून घेतला म्हणजे नेमके काय घडले? वर्णवर्चस्वाच्या, उच्चनीचतेच्या उतरंडीत वरचे स्थान मिळाले. परंतु त्या उतरंडीस मान्यता दिल्यासारखे झाले. समतेचा पुरस्कार करणाऱ्या शाहू महाराजांकडून वेदांचे व उतरंडीचे अभावितपणे आणि अप्रत्यक्षपणे समर्थन झाले.

यानंतर शाहू महाराजांनी 'वैदिक स्कूल' काढले. ब्राह्मणेतरांना वेदाचे मंत्र शिकवले आणि ब्राह्मण पुरोहितांच्या जागी ब्राह्मणेतर पुरोहित आले. 'पुरोहितशाहीच नको' ही म. फुल्यांची भूमिका दुर्लक्षिली गेली. ब्राह्मणी वर्चस्वाला तडाखा बसला,

परंतु पुरोहितशाहीवरचा तडाखा कमी झाला.

नंतर महाराजांनी 'क्षात्र जगद्गुरू पीठ' स्थापन केले. मराठ्यांतील जगद्गुरू निर्माण केला. ही कृतीसुद्धा म. फुल्यांच्या शिकवणुकीच्या विसंगत आणि विरोधी अशीच आहे आणि म्हणूनच भास्करराव जाधव इत्यादी बुद्धिवादी ब्राह्मणेतर नेत्यांनी महाराजांची इच्छा किंवा आज्ञा असतानासुद्धा क्षात्र जगद्गुरूंच्या पाया पडण्यास विरोध केला आणि पाया पडले नाहीत. त्यामुळे शाहू महाराज भास्करराव जाधवांवर नाराज होऊन त्यांनी तसे पत्रही पाठवले होते.

अर्थात महाराजांनासुद्धा या पीठाच्या स्थापनेतील उणिवा आणि दोष यांचे भान असावे असे वाटते. त्यांनी पीठाची स्थापना करतानाच क्षात्र जगद्गुरूंकडून काही अपेक्षा स्पष्टपणे व्यक्त केल्या होत्या. क्षात्र जगद्गुरूने देव आणि माणूस यांच्यामधील दलाल म्हणून काम करू नये आणि माणसांनी उचललेल्या पालखी किंवा इतर वाहनांत बसू नये, अशी महाराजांची अपेक्षा होती.

खरे म्हणजे, त्या काळी अनेक ब्राह्मणेतर जाती आपण उच्चवर्णीय क्षत्रिय आहोत असा दावा करीत होत्या. केरळातील इजवा, तामिळनाडूमधील नाडर, उत्तर प्रदेशातील कुर्मी आणि यादव, आंध्रातले रेड्डी, महाराष्ट्रातले मराठे हे आपण उच्चवर्णीय क्षत्रिय आहोत असा दावा करीत होते. याचाही शाहू महाराजांवर परिणाम असावा असे वाटते. शाहू महाराजांनी स्वत:स अनेक वेळेला आर्यसमाजिस्ट म्हणवून घेतले आहे व आर्यसमाजी म्हणून कार्य केले आहे. आर्यसमाजिस्ट तर वेदांचा अधिकार सर्वच वर्णांना आहे आणि असावा, असे प्रतिपादित होते. महाराज आर्यसमाजिस्ट असायला हे एक कारण असावे.

कारणे आणि मर्यादा आहेतच. परंतु या सगळ्याचा महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीवर एक गंभीर दुष्परिणाम झाला. तो अजूनही दुरुस्त झालेला नाही.

म. फुल्यांच्या शुद्ध सत्यशोधक चळवळीवर आणि सामाजिक समतेच्या उज्ज्वल चळवळीवर जातीय चळवळीची छाप पडू लागली. पुढे चेम्सफोर्ड सुधारणांचा हप्ता दृष्टिपथात दिसू लागताच त्या चळवळीला ज्या प्रमाणात उघड राजकारणाचे स्वरूप येऊ लागले; त्या प्रमाणात मूळ सत्यशोधक प्रेरणांची व शिकवणुकीची पीछेहाटही अपरिहार्यपणे होऊ लागली.

ब्राह्मणेतर चळवळीच्या पुढाऱ्यांनी तर सर्वांना मताधिकार देण्यास त्या काळी विरोध केला. श्रीमंतांनाच मताधिकार असावा अशी मागणी केली. म. फुल्यांना अतिप्रिय असलेल्या शूद्रातिशूद्रांना मताधिकारापासून वगळण्याची त्यांची भूमिका होती.

ब्राह्मणेतर चळवळ ही जातीय बनू लागली आणि शूद्रातिशूद्र ब्राह्मणेतरांपासून

स्वत:स क्षत्रिय म्हणवणारे मराठे अलग पडले. पुढे पुढे आणि आतासुद्धा ब्राह्मणांवर वर्चस्ववादी वागणुकीसाठी टीका करणारे मराठे स्वत: तसेच वागत आहेत.

मराठ्यांत 'ब्राह्मण्य' येते आहे. मराठ्यांत ब्राह्मण तयार होताहेत. ही लागण आता दलितांतही होते आहे.

म. फुल्यांच्या, शाहू महाराजांच्या, डॉ. आंबेडकरांच्या महाराष्ट्रात वर्णवर्चस्ववादी शक्ती प्रबळ व्हायला जी अनेक कारणे आहेत; त्यांपेक्षा एक महत्त्वाचे कारण असे आहे की, महाराष्ट्रातील 'बहुजन' असलेल्या जातींनी म. फुल्यांच्या शुद्ध सत्यशोधकी विचारांपासून फारकत घेतली आहे.

हे दुरुस्त झाल्याखेरीज आणि आणखी काही केल्याखेरीज महाराष्ट्राच्या प्रतिगामी राजकारणाच्या वर्चस्वाचा पराभव होऊ शकणार नाही.

शाहू महाराज आज असते तर त्यांनी काय केले असते, याचा विचार करावा. त्यांच्या मर्यादा लक्षात ठेवून त्या ओलांडाव्यात आणि आणखी पुढे जावे. खऱ्या शाहू भक्तांनी शाहू महाराजांच्या खांद्यावर उभे राहून दूरवरची क्षितिजे न्याहाळावीत. हीच खरी शाहू विचारांची व व्यवहारांची प्रेरणा आहे.

❑❑❑

# राजर्षी शाहू : आर्थिक धोरण आणि विचार

राजर्षी शाहू महाराजांची समाजातील प्रतिमा 'समाजसुधारक' अशी आहे आणि ती बरोबर आहे. परंतु या प्रतिमेमुळे त्यांच्या व्यवहारातील आणि विचारांतील इतर सुधारणांकडे दुर्लक्ष होते.

शाहू महाराजांचे आर्थिक धोरण आणि त्यांचे आर्थिक विचार समाजापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचले आहेत, असे मात्र नाही. त्यांच्या जुन्या-नव्या चरित्रकारांनी त्यांचा काही आढावा घेतला आहे.

## शाहू राजांचा काळ

कुणाही व्यक्तीचे, तिच्या कार्याचे किंवा एखाद्या घटनेचे यथायोग्य मूल्यमापन करताना त्या व्यक्तीचा किंवा घटनेचा काळ लक्षात घेतला पाहिजे. तसे केले नाही आणि 'कसोटी आजची आणि व्यक्ती १९१५ची'. असा विचार केला तर तयार होणारे चरित्र विकृत तयार होते.

## इतरत्र काय होते?

त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर, बडोदा यांसारखी मोजकी संस्थाने सोडली तर भारतातील इतर सर्व संस्थानिक आपल्या प्रजेची फारशी काळजी करत नव्हते. राजा हा प्रजेसाठी नसून प्रजा राजासाठी आहे, अशा गृहीतावर त्यांचा व्यवहार सुरू होता. ते स्वत: ऐषआरामात आणि चैनीत मश्गूल होते आणि ब्रिटिशांची मर्जी खप्पा होऊ नये म्हणून स्वाभिमानशून्य लाचारीचे जिणे जगत होते किंवा ब्रिटिशांना घाबरून कसेबसे तगून होते.

ब्रिटिशांची भूमिका भारतीय प्रजेसाठी फारसे काही न करण्याची होती. भारतीय

प्रजेचे शोषण करणे, हा त्यांचा मुख्य कार्यक्रम व धोरण होते. १९१७ सालच्या शेवटी रशियात कामगार क्रांती झाली होती. परंतु नवे सोविएत युनियन साम्राज्यवादी राष्ट्रांच्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्यात आणि कामगार राज्याचे संरक्षण करण्यात गुंतले होते. तिथे अजून कामगार-शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण प्रत्यक्ष अमलात येऊन त्याचे परिणाम दिसायचे होते आणि जगाला कळायचे होते. परंतु हा अपवाद आणि ही नवी भूमिका सोडली तर जगभरच्या राज्यकर्त्यांची भूमिका काय होती?

'देशाचे संरक्षण आणि देशांतर्गत कायदा-सुव्यवस्था एवढीच राज्यकर्त्यांची कामे आहेत. आर्थिक जीवनात शासनाने ढवळाढवळ किंवा हस्तक्षेप करू नये,' असे त्यांचे तत्त्वज्ञान होते. राज्यकर्त्यांनी कर गोळा करावा आणि संरक्षण व कायदा व्यवस्था यांसाठी तो खर्च करावा. याखेरीज इतर आर्थिक व्यवहार करू नये, अशी त्यांची भूमिका होती. आर्थिक क्षेत्रात प्रजेने ज्याचे त्याने पाहावे. त्यांना सुखी करणे, त्यांच्या प्रगतीला मदत करणे, त्यांना शहाणे करणे किंवा आर्थिक जीवनातील विषमता दूर किंवा कमी करणें ही कामे राजाची किंवा राज्यकर्त्यांची नाहीत, असा विचार प्रबळ होता.

मुक्त अर्थव्यवस्था, खुली स्पर्धा, लेसेज् फेअर ही आर्थिक धोरणांची सूत्रे होती. जो समर्थ असेल तो टिकेल. जो दुबळा असेल तो मरेल, नव्हे मरावाच, असे अर्थशास्त्राचे तत्त्व प्रचलित होते.

अशा या काळात शाहू राजांचे आर्थिक धोरण काय होते, हे पाहावे.

## वास्तव परिस्थिती

आणखी एक मुद्दा आहे. शाहूराजा ज्या भूमीवर राज्य करीत होता ती भूमी कशी होती? ते लोक कसे होते? त्यांच्या क्षमता काय होत्या? त्या काळच्या त्या भूमीच्या आणि त्या लोकसमूहाच्या काही मर्यादा होत्या का?

शाहू महाराजांच्या संपूर्ण राज्याचा विस्तार आताच्या कोल्हापूर जिल्ह्यापेक्षा जरासा मोठा होता. कोल्हापूर संस्थान आणि शाहू महाराजांची जहागिरी मिळून क्षेत्र ३,२१७ चौरस मैल होते. सध्याच्या कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ३,१८८ चौरस मैल आहे. सध्या कर्नाटकात असलेला कटकोळ, रायबाग आदी भाग शाहू महाराजांच्या अंमलाखाली होता.

शाहू महाराजांच्या कारकिर्दीत त्यांच्या राज्याची लोकसंख्या साडेआठ ते नऊ लाखाच्या आसपास राहिली. १८९३-९४ मध्ये साक्षर लोकसंख्येचे प्रमाण २.८ टक्के होते ते १९२१-२२ साली ४.४ टक्क्यांपर्यंत वाढले.

## शेती

शेती हाच मुख्य व्यवसाय होता. १८९३-९४ मध्ये प्रत्यक्ष शेतीखालील जमीन १२,९४,१९६ एकर होती. ती १९२१-२२ साली १४,२६,५३५ एकर इतकी वाढली. म्हणजे कशीबशी १० टक्क्यांहून थोडी जास्त वाढ झाली होती.

शाहू महाराजांच्या राज्यात शेतीसाठीच्या जमीनधारणेचा विचार करता असे दिसते की, शेतीचे तुकडे लहान लहान होते. शेतकऱ्यांकडे असलेल्या जमिनीचा आकार मोठा असावा असे त्यांचे मत होते. "वाटणी व्यवहाराने शेतीचे लहान लहान तुकडे होतात. ते किफायतशीर राहत नाहीत आणि शेतकरी त्या तोट्याच्या शेतीच्या व्यवसायात अडकून पडतो आणि प्रगतीला मुकतो." असे त्यांचे स्पष्ट विचार होते.

२२ मार्च १९२० रोजी महाराजांनी माणगाव येथे महार समाजाच्या परिषदेत भाषण केले. त्यात ते म्हणतात, "तुम्ही साधारण माणशी दहा एकर जमीन वाट्याला येईल, असे तुमच्या महारकीचे तुकडे करा व हे उत्पन्न तुमच्यातील जे वडील असतील त्यांचेकडे चालवा... (त्यामुळे) सर्वांनीच अर्धपोटी राहायचे ते वाचेल..."

१९१३ साली शाहू महाराजांनी एक कायदा करून संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य केली. वाटणी करता येणार नाही, असे ठरवले.

क्षत्रिय असणारी आणि स्वत:ला क्षत्रिय म्हणवून घेणारी संस्थानातील काही मंडळी शेती करणे हे कमीपणाचे मानीत. हे लक्षात घेऊन शाहू महाराजांनी एके ठिकाणी भाषण करताना सांगितले, "...कृषिकर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वत:ला सुख होऊन सर्व मनुष्यजातीलाही सुख मिळते. कृषिकर्म करताना क्षात्रधर्माला बाधा येते, असे नाही. ज्यावर मनुष्य समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे ते कर्म करणारे नीच आहेत, शूद्र आहेत, हे म्हणणे मला मुळीच पटत नाही..."

श्रमाची प्रतिष्ठा या विचारातून स्पष्ट होते.

## पाणीपुरवठा

महाराष्ट्रातल्या इतर भागांप्रमाणे कोल्हापूर संस्थानातही महाराजांच्या काळी दुष्काळ पडत असे. दुष्काळाच्या काळात मदत करण्याची भूमिका त्यांची होतीच. परंतु दुष्काळ निर्मूलनाचा खरा मार्ग शेतीला पाणीपुरवठा वाढवणे हाच होय, याचे भान शाहू राजांना होते. नद्या, विहिरी आणि तलाव या सर्व मार्गांचा अवलंब

संस्थानात होत होता. सन १९१५-१६च्या अहवालावरून असे दिसते की, नद्यांपासून ३९,७८३ एकर, विहिरींपासून ३९,८४५ एकर आणि तलावांपासून २३२ एकर असा एकूण ७९,८६० एकरांना पाणीपुरवठा होत होता. तळी, विहिरी, बंधारे बांधण्यास शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले व साहाय्यही केले.

## राधानगरी धरण

संस्थानाचा आकार, आर्थिक कुवत आणि तंत्रज्ञानाची मर्यादित उपलब्धता हे लक्षात घेता शाहू महाराजांनी आखलेली व कार्यान्वित केलेली राधानगरी धरणाची योजना त्यांच्या महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीच्या धोरणाचे प्रतीक मानले पाहिजे. १९०७ सालापासून पाहणी व आखणीचे काम सुरू होते. नोव्हेंबर १९०९ मध्ये या धरणाच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात झाली. धरणाने तयार झालेल्या विशाल तलावाला ज्यांचे नाव देण्यात आले आहे, त्या महाराणी लक्ष्मीबाई यांच्या हस्ते हे काम सुरू करण्यात आले होते. धरणाला अनेक अडचणी आल्या. पैसा कमी पडू लागला. बांधकामाच्या टिकाऊपणाबद्दल शंका व्यक्त झाल्या. सुरुवातीला कालव्यांचाही विचार होता. मधूनमधून काम थंडावलेसुद्धा, परंतु महाराजांनी चिकाटीने हे काम सुरू ठेवले. संस्थानातील त्यांचे सर्वात भव्य स्मारक ठरलेले हे धरण महाराजांच्या हयातीत पूर्ण होऊ शकले नाही, पण बरेच काम झाले होते. पुढे राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत हा प्रकल्प पुरा झाला. पुढे पायथ्याशी विद्युतनिर्मिती केंद्रही स्थापन झाले.

कोल्हापुरात आज दिसत असलेल्या 'हरितक्रांती'चा खरा प्रणेता शाहू राजाच होता. त्यांनी ठेवलेल्या वारशावरच आजच्या कोल्हापूरच्या शेतीची प्रगती स्थिरावली आहे.

एवढ्या दूर पल्ल्याचा दृष्टिकोन इतरत्र क्वचितच आढळतो. त्यामुळे त्यांचे द्रष्टेपण अधिकच उजळून दिसते.

## प्रयोग व संशोधन

शेती सुधारणेसाठी नवनव्या अवजारांची गरज शाहू महाराजांनी ओळखली होती. जुनी हत्यारे-अवजारे जाऊन नवी यावीत यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे,

"...देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे त्यांनी प्रथमत: आपल्या शेतीच्या सुधारणेकडे लक्ष दिले पाहिजे. इतर देशांच्या मानाने आपल्या शेतीचे उत्पन्न सरासरीने पुष्कळ कमी आहे... शेतकी सुधारणेस सुधारलेल्या औतांची फार जरुरी

आहे...''

## शेतीसंस्था-प्रदर्शने-प्रात्यक्षिके

१९१२ साली कोल्हापुरात स्वतंत्र शेतीसंस्था स्थापण्यात आली होती. सुधारित अवजारांचे एक म्युझियम उघडण्यात आले होते. त्यातील अवजारे प्रयोगांसाठी शेतकऱ्यांना देण्यात येत असत. इतकेच नव्हे, तर महाराजांच्या कारकिर्दीत शेतीमधील प्रयोग करून दाखवणाऱ्या एका डेमॉन्स्ट्रेटरची नेमणूकही करण्यात आली होती. आज प्रात्यक्षिके दाखवतात तशी ऐंशी वर्षांपूर्वी कोल्हापूर संस्थानात दाखवली जात होती. शाहू महाराजांची दूरदृष्टी दिसते ती अशी.

महाराजांच्या कारकिर्दीत शेती व जनावरांची प्रदर्शने भरवली जात. स्पर्धा लावल्या जात. बक्षिसे दिली जात. आदर्श शेतीचे प्रयोग करून दाखवले जात. शेती सुधारणेसाठी जे जे शक्य होते, ते ते केले जाई. आता स्वातंत्र्यानंतर उपयुक्त ठरलेल्या सर्व प्रयोगांची बीजे शाहू महाराजांच्या कारकिर्दीत आढळतात.

## पीकपद्धती - नवी पिके

संस्थानाच्या हद्दीत वेगवेगळी पिके लावण्याचासुद्धा उपक्रम शाहू महाराजांनी केला व करवून घेतला. पन्हाळा व भुदरगड येथे चहाची व कॉफीची लागवड करून पाहिली. याच भागात वेलदोडे, कोको, रबर, ताग, अंबाडी, बटाटे, लाख, ट्रॅपिओका, कंबोडियन कापूस ही पिके लावण्याचा उपक्रम करून पाहिला.

रोपे करून महाराजांनी बागा करविल्या. खतांचे प्रयोग केले. हिरडा, जांभूळ, ताग, काजू, साग, अंबा, फणस इत्यादींच्या बागा लावायला प्रोत्साहन व प्रत्यक्ष साहाय्य केले.

या नव्या प्रयोगांतून साध्य काय झाले, यासंबंधी वाद असू शकतील. पण त्यातून महाराजांची उपक्रमशीलता दिसते. आज कोल्हापूर जिल्ह्यातला शेतकरी उपक्रमशील आहे. या वास्तवाचा शाहू महाराजांच्या ऐंशी वर्षं पूर्वीच्या उपक्रमशीलतेशी संबंध आहे.

शेतीच्या जोडधंद्यांचाही शाहू महाराजांनी विचार केला होता. त्यांच्या भाषणात तसे स्पष्ट उल्लेख आढळतात.

शेतकीच्या जनावरांची पैदास, त्यांच्या चांगल्या जातींची पैदास, कोंबडी व बदकांची पैदास, दुधदुभत्याची उत्पत्ती याही बाबी त्यांच्या आर्थिक विचारांचा भाग बनल्या होत्या.

## सहकार व शाहू महाराज

आज महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात कोल्हापूर एक अग्रेसर जिल्हा आहे. त्याचीसुद्धा स्पष्ट सुरुवात शाहू महाराजांच्या कारकिर्दीत झालेली आहे. १९१२ साली त्यांनी 'सहकारविषयक कायदा' केला आहे. आज नावारूपाला आलेली 'अर्बन को-ऑप. बँक' आणि 'बलभीम को-ऑप. बॅंक' या त्यांच्याच कारकिर्दीत निघाल्या. १९२०-२१ सालीच कोल्हापूर संस्थानातील सहकारी सोसायट्यांची संख्या ३७ होती.

या संदर्भात महाराजांच्या एका भाषणातील खालील उतारा पाहा—

"...पुष्कळ लोकांनी आपली कुशलता, अक्कल, पैसा व अंगमेहनत एकत्र केली पाहिजे. म्हणजे सहकार्य केले पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटुंब एका ठिकाणी काम करी व येणारा नफा त्या कुटुंबातील माणसांना उपयोगी पडे. आता ही आपली कुटुंबाची व्याख्या पुष्कळ विस्तृत केली पाहिजे. १०/२०/२५ कुटुंबे या उद्योगधंद्यासाठी एक झाली पाहिजेत ...आपण सहकार्य करायला शिका. आपली सहकारी पतपेढी काढा. इतकेच नव्हे तर सहकारी कारखाने, सहकारी दुकानेही काढा..."

कोल्हापूर जिल्ह्याच्या आजच्या आर्थिक विकासातील व प्रगतीमधील जवळ जवळ प्रत्येक गोष्ट शाहू महाराजांच्या कार्याशी व विचाराशी निगडित आहे.

## संस्थानातील उद्योगधंदे

शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचे व व्यवहारांचे प्रतिबिंब स्पष्टपणे त्यांच्या उद्योगधंद्यासंबंधीच्या धोरणात दिसते.

उद्योगधंदे काढणे व चालवणे हे राजाचे काम नाही, अशा विचारांचा प्रभाव असलेला तो काळ होता. उद्योग, व्यवसाय, धंदे, व्यापार इत्यादी आर्थिक व्यवहार वाढवण्याचे काम शासनाचे नाही असे मानले जाई. ब्रिटिशांचे भारतातील धोरणही तसेच होते. भारतात उद्योगधंदे वाढवण्यावर त्यांचा भर नव्हताच. अशा काळात शाहू महाराजांचे यासंबंधीचे विचार महत्त्वाचे वाटतात. शाहू महाराजांच्या भाषणातील खालील उतारे त्यांचे धोरण स्पष्ट करतात.

"...आर्थिक संपन्नता औद्योगिकीकरणावर अवलंबून आहे. लोकांनी एकत्र येऊन सहकारी कारखाने, सहकारी संस्था व सहकारी बाजारपेठांची व्यवस्था राबवली पाहिजे. कोल्हापूर संस्थान त्याकरिता सर्व प्रकारची मदत देण्यास तयार आहे..." या भाषणातील 'सहकारा'वरील भर जसा महत्त्वाचा तसाच 'संस्थान सर्व प्रकारच्या मदतीस तयार असल्याचा' भरसुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे.

आता हा दुसरा उतारा पाहा.

"...कारखानदारीच्या क्षेत्रातील मक्तेदारी, भांडवलशाही आणि तिच्यावर श्रमिक आणि इतरेजन यांनी पूर्णपणे अवलंबून असणे रास्त नव्हे. अशा प्रकारची व्यवस्था भारतात मुळीच योग्य नाही..."

ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या सततच्या दडपणाखाली व्यवहार करावा लागत असलेला एका संस्थानचा राजा विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात हे बोलतो, हे लक्षात ठेवले म्हणजे शाहू महाराजांचे तुलनात्मक पुरोगामीत्व लक्षात येईल.

शाहू महाराजांच्या भाषणातील याच संदर्भातील आणखी एक उतारा पाहा.

"...उद्योगांचे केंद्रीकरण झाल्यास खेड्यांतून येणाऱ्या लोंढ्यामुळे शहरात गर्दी होऊन आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम उद्‌भवतात. ते टाळण्यासाठी विकेंद्रीकरणाची गरज आहे..."

२१व्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेल्या भारताला मार्गदर्शक असणारी ही आर्थिक धोरणाची सूत्रे १९२०च्या आगेमागे शाहू महाराजांनी सांगितली होती, हे या आर्थिक विचारांचे वैशिष्ट्य आहे.

## धोरणानुसार व्यवहार

शाहू महाराजांची प्रसिद्धी 'बोलके' सुधारक म्हणून नाही, तर 'कर्ते' सुधारक म्हणूनच आहे आणि ती बरोबर आहे.

शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणासंबंधीच्या उपरोक्त विचारांवर आधारित व्यवहारही त्यांनी त्यांच्या संस्थानात केला.

१९०५ साली संस्थानातील काही व्यापाऱ्यांनी एक जॉइंट स्टॉक कंपनी स्थापन केली व त्यामार्फत सूतगिरणी चालू केली. शाहू महाराजांनी या कंपनीच्या भागभांडवलात दरबारची बरीच रक्कम गुंतवली. खूप मोठी जमीन मोफत दिली आणि पाणीपुरवठासुद्धा मोफत पुरवला. शेजारचे एक तळे यासाठी मोफत दिले. या सूतगिरणीचा पायाभरणी समारंभ शाहू महाराजांच्याच हस्ते झाला आणि या गिरणीस नावसुद्धा त्यांचेच देण्यात आले. कोल्हापूरची 'शाहू मिल' ही तीच गिरणी. १९१०-११ साली या गिरणीतून उत्पादन सुरू झाले. अंतर्गत मतभेदामुळे १९१५-१६ साली ही संस्थानच्या मालकीची बनवली गेली. १९२८ सालापर्यंत या गिरणीत फक्त सूतउत्पादन होत असे. पुढे कापड निघू लागले.

१९०८-०९ या वर्षात इचलकरंजीस एक जिनिंग फॅक्टरी सुरू करण्यात आली. १९१२-१३ पर्यंत त्यांची संख्या ६ झाली. तीसुद्धा एका गावात नव्हे; कोल्हापुरात २, इचलकरंजीत १, शिरोळला १, चिंचलीला १ आणि

गडहिंग्लजला १ अशा विविध ठिकाणी फॅक्टऱ्या सुरू झाल्या. या सर्व ठिकाणी महाराजांनी सर्व प्रकारे मदत केली.

१९१२-१३ साली रायबाग येथे 'शाहू वीव्हर्स असोसिएशन' या नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. धंद्यात अपयश आलेले अनेक विणकर, कामगार गाव सोडून विखुरले होते. या सर्वांना एकत्र करण्यात आले. सुमारे १६० स्त्री-पुरुष विणकर या संस्थेचे सभासद होते. विणकरांनी गाव सोडू नये म्हणून महाराजांनी त्यांना बिनव्याजी कर्ज दिले, राहण्यासाठी जागा दिली. थोडी थोडी रयतावा जमीन दिली. तिथे साड्या, धोतरे, खण, चादरी तयार होत. या मालाला दरबार मागणी कमी पडू देणार नाही, अशी स्पष्ट हमी महाराजांनी दिली.

अशा रितीने प्रजेची काळजी करणारा आणि उद्योगधंद्यात मदत करून त्यांना स्वावलंबी बनण्यास साहाय्य करणारा दुसरा संस्थानिक भारतात शोधून सापडणे कठीण आहे.

तपशीलवार उदाहरणे खूप देता येण्याजोगी आहेत. रंगाचे कारखाने, राळ तयार करण्याचा व्यवसाय, कात कारख़ाना, सूत रंगवण्याचे व्यवसाय, तेलगिरण्या इत्यादी अनेक व्यवसाय शाहू महाराजांच्या काळात सुरू झाले.

१८९४ मध्ये शाहू महाराज गादीवर आले तेव्हा संपूर्ण कोल्हापूर संस्थानात नाव घेण्याजोगा एकही मोठा उद्योग किंवा कारखाना नव्हता. त्यांच्या कारकिर्दीच्या शेवटी मात्र अनेक व्यवसाय, उद्योग, कारखाने सुरू झाले होते.

उद्योग निघावेत, रोजगार वाढावा, उत्पादन वाढवावे, सुबत्ता वाढवावी, त्याचा लाभ सर्व भागांत व्हावा आणि या सर्व कामांत संस्थानाचा सक्रिय आणि महत्त्वाचा सहभाग असावा अशी त्यांची भूमिका होती. असा त्यांचा आर्थिक व्यवहार होता.

## रस्ते, रेल्वे इत्यादी

उद्योगधंदे आणि व्यापार यांच्या वाढीसाठी दळणवळणाच्या साधनांचे, विशेषत: रेल्वे, रस्ते यांचे, महत्त्व अनन्यसाधारण असते. सामाजिक अभिसरणासाठीसुद्धा हे अत्यावश्यक असते.

शाहू राजांच्या कारकिर्दीस सुरुवात झाली तेव्हा संस्थानात रस्ते खूप अपुरे होते. होते ते रस्ते मुख्यत: संस्थानाबाहेरून येऊन पुन्हा संस्थानाबाहेर जाणारे होते. शाहू महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत रस्तेबांधणीवर लक्ष दिले. त्यांच्या कारकिर्दीत १८५ मैल लांबीचे नवे रस्ते तयार करण्यात आले. हा सर्व खर्च दरबाराने केला.

शाहू महाराजांच्या कारकिर्दीपूर्वी संस्थानात दर हजार चौरस मैलात ७२.४ मैल लांबीचे रस्ते होते. १९२२ साली त्यांच्या निधनाच्या वर्षी हे प्रमाण वाढून

दर हजार चौरस मैलास १२९.९ मैल लांबीचे रस्ते झाले. खेडी शहरास जोडली गेली. खेड्यांतील माल शहरात येऊन त्याला त्यातल्या त्यात बरा दर-दाम मिळू लागला. शहरात निर्माण होणारा शेतीउपयोगी व संसारोपयोगी माल खेड्यात जाऊ लागला. अशा प्रकारे सामाजिक अभिसरण वाढले.

भारतातील रेल्वे प्रदीर्घ काळ खाजगी मालकीचीच होती. कोल्हापूर संस्थानातील रेल्वे मात्र सरकारी क्षेत्रातच सुरू झाली. कोल्हापूर शहर मिरज रेल्वे जंक्शनला जोडणाऱ्या रेल्वेचे काम इ. स. १८८८ मध्ये शाहू महाराजांच्या हस्ते सुरू झाले. इ. स. १८९१ मध्ये ते काम पूर्ण झाले. सर्व खर्च सरकारने केला. पुढे काही गुंतवणूक रेल्वेत होतच होती. १९०६ अखेर एकूण गुंतवणूक २३ लाख २६ हजार रुपयांची झाली होती.

वाहतुकीच्या साधनांचा विकासाशी असलेला थेट संबंध लक्षात घेऊन शाहू महाराजांनी या कामी लक्ष घातल्याचे दिसते. मूळ योजनेत संस्थानातील रेल्वे लाईन ही कोल्हापूर-निपाणी-रायबाग अशी टाकायची होती. परंतु राधानगरी धरणाच्या बांधकामात पैसा कमी पडू लागला म्हणून मग ही योजना सोडून द्यावी लागली.

रेल्वे लाईन महत्त्वाची हे खरेच. परंतु त्यापेक्षा धरण अग्रक्रमाने महत्त्वाचे ही भूमिका यातून दिसते. शेतीविकास व उत्पादनवाढीस वाहतूक व्यवस्थेपेक्षा अग्रक्रम देणे रास्तच होते. यातून योग्य दृष्टिकोनच दिसतो.

## व्यापार

आर्थिक सुबत्तेसाठी व्यापारउदीम वाढला पाहिजे आणि त्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत, अशी शाहू महाराजांची भूमिका असल्याचे दिसते.

शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानात उद्योगधंद्यांतून किंवा कारखान्यांमधून तयार होत असलेल्या मालाच्या व्यापाराचा प्रश्न महत्त्वाचा नव्हता. कारण त्या प्रकारच्या मालाचे उत्पादन अतिमर्यादित होते. परंतु शेती-उत्पन्न वस्तूंच्या व्यापाराचा प्रश्न निश्चितच होता.

कोल्हापूरच्या व्यापारपेठेचे जनकत्वसुद्धा शाहू महाराजांकडेच जाते. त्यांच्या काळी तुलनात्मक दृष्ट्या निपाणी येथे व्यापार जास्त चालत असल्याचे दिसते. एकदा महाराजांनी निपाणीच्या व्यापाऱ्यांना कागल येथे बोलावून घेतले आणि त्यांच्याशी कोल्हापूर शहरात व्यापारपेठ बसवण्यासंबंधी विचारविनिमय केला. त्यांनी कोल्हापुरात येऊन त्यांच्या व्यापारपेढ्या सुरू कराव्यात म्हणून त्यांना सांगितले आणि अनेक सवलती देऊ केल्या.

इ. स. १८९५ मध्ये 'शाहूपुरी व्यापार पेठ' स्थापन करण्यात आली. या पेठेत

व्यापारपेठ्या काढणाऱ्या व्यापाऱ्यांना मोठमोठ्या आकाराचे प्लॉट्स मोफत देण्यात आले. इतर सवलती देण्यात आल्या. करात सवलती दिल्या.

ही व्यापारपेठ तेव्हाच्या कोल्हापूर शहरापासून दूरवर ओढ्याच्या पूर्वेस आणि रेल्वेस्टेशनच्या जवळ वसवण्यात आली होती. व्यापारी वसाहत शहरापासून दूर वसवणे हा दृष्टिकोनही महत्त्वाचा आणि रेल्वेस्टेशन जवळ वसवणे हाही दृष्टिकोन महत्त्वाचा. शहर विस्ताराच्या क्रमात आज ही पेठही शहराच्या मध्यवस्तीत आली, रेल्वेस्टेशनही गावात भर वस्तीत आले आणि शहरापासून तेव्हा दूर असलेली गुळाची व्यापारपेठ आणखी दूर न्यावी लागली, हा भाग वेगळा.

शहरापासून महाराजांनी व्यापारपेठ दूर वसवली होती म्हणून पोस्ट खात्यास विनंती करून तिथे पोस्टाची व तारा करण्याची सोय करण्यास सांगितले होते.

कोल्हापूर शहरापुरते न पाहता आर्थिक विकेंद्रीकरण करण्याचा दृष्टिकोन ठेवून महाराजांनी जयसिंगपूर व गडहिंग्लज येथेही व्यापारास उत्तेजन दिले. त्यामुळे जयसिंगपूर येथे तंबाखूची आणि गडहिंग्लज येथे गूळ, मिरची, भुईमूग यांची व्यापारपेठ तयार झाली.

कोल्हापूरची व्यापारपेठ म्हणजे मुख्यत: गुळाची व्यापारपेठ. मुख्य शेतीउत्पन्न म्हणजे गूळ. आज देशभर 'कोल्हापुरी गूळ' प्रसिद्ध आहे. शाहू महाराजांच्या काळापूर्वी तसा कोल्हापूरी गूळ प्रसिद्ध नव्हता. या भागातील गुळाची व्यापारपेठ म्हणजे कोकणातली राजापूरची पेठ प्रसिद्ध होती. 'राजापुरी गूळ' जास्त प्रसिद्ध होता. अर्थात गूळ निर्माण होई वर घाटावर कोल्हापूर परिसरात आणि त्याचा व्यापार मात्र होत असे राजापुरात. म्हणून राजापुरी गूळ प्रसिद्ध होता. शाहू महाराजांनी कोल्हापुरात गुळाची व्यापारपेठ स्थापन केली. ती भरभराटीस आली आणि राजापुरी गुळाऐवजी कोल्हापुरी गूळ प्रसिद्ध पावला.

या सर्व प्रयत्नांचे सुपरिणाम दिसणे भाग होते. संस्थानाबाहेर होणाऱ्या शेतीमालाच्या निर्यातीच्या आकड्यात हे परिणाम दिसतात.

इ. स. १८९४-९५ मध्ये ही निर्यात जेमतेम ६ लाख रुपये होती. तीच १९२१ साली ३० लाख रुपये झाली. ५ पट वाढ झाली. व्यापारवृद्धीसाठी असे प्रयत्न केलेले इतर संस्थानिक कुणी फारसे दिसत नाहीत.

## दुष्काळ-निवारण योजना

देशातल्या इतर ठिकाणांप्रमाणे कोल्हापूर संस्थानातसुद्धा दुष्काळ पडत होता. महाराजांच्या कारकिर्दीत १८९६-९७, १८९९-१९०० आणि १९१८-१९ असे तीन दुष्काळ पडल्याचे दिसतात. दुष्काळाचा तडाखा मुख्यत: आळते,

शिरोळ व रायबाग भागांत जास्त जाणवत होता.

दुष्काळात मजुरीची कामे काढणे, कर्जे देणे, गुरे पोसणे, वाजवी किमतीत अन्नधान्य पुरवणे, अन्नधान्य आयातीस प्रोत्साहन देणे, एरवी धान्य साठवण्यास प्रोत्साहन देणे, जनावरांसाठी चाऱ्याचा साठा करणे, चारा पुरवणे, सरकारी जमीन चरण्यास देणे अशा उपाययोजना महाराजांनी केल्याच्या नोंदी आहेत.

दुष्काळाच्या काळात भास्करराव जाधव हे खास दुष्काळ आयुक्त म्हणून काम करीत असल्याची नोंद आहे. याखेरीज दुष्काळाकडे लक्ष देण्यासाठी खास खाते व अधिकारी नेमले होते.

दुष्काळाच्या काळात केवळ सोयी, सवलती देऊन महाराज थांबले नव्हते. दुष्काळ निर्मूलनाचे दीर्घ काळासाठीचे प्रयत्नही त्यांनी केले. धरणे, तळी, विहिरी इत्यादी कामे केली व करवली.

## शाहू महाराजांचे धोरण आणि आजची आर्थिक स्थिती

आता एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर भारतातील आर्थिक धोरणात एक नवी दिशा आणण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो आहे. "ज्याचे त्याने पहावे", "शासनाने आर्थिक व्यवहार, उद्योगधंदे करू नयेत. इतकेच नव्हे शेती असो, शेतकरी असो, व्यापार असो की कारखानदारी किंवा उद्योगधंदे असोत; ज्याचे त्याने पहावे." असे मत मांडले जाते. सबसिड्या बंद करा, शेतकऱ्यांना सवलती देऊ नका, छोट्या आणि देशी उद्योगांना सोयी, सवलती व संरक्षण देऊ नका, अशा मागण्या देशी व परदेशी विद्वान करीत आहेत. सबळाने जगावे, दुर्बळास कुणी मदत करण्याचे कारण नाही. दुर्बळास जगण्याचा अधिकार नाही असे तत्त्वज्ञान मांडले जाते.

शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाशी हे विसंगत आहे.

शाहू महाराजांचा काळ आणि आताचा काळ वेगळा आहे. म्हणून ते धोरण आता लागू-होऊ शकत नाही असे कुणी म्हणेल. काळ बदलला आहे हे खरे आहे. तंत्रज्ञानात अमाप प्रगती झाली आहे हेही खरे आहे; तेव्हा धोरणात त्यानुसार काही बदल व्हायला पाहिजेत हे बरोबर आहे. परंतु अजूनही शेतीत दुर्बल घटक आहेत. मागासलेले प्रदेश आहेत. उद्योगधंद्यात मागासलेपण आहे. बेकारीचा प्रचंड प्रश्न आहे. दुबळी शेती प्रगत कारखानदारीसमोर टिकाव धरायची असेल आणि ग्रामीण भागात जगणाऱ्या ६० टक्के, ७० टक्के जनतेस दिलासा द्यायचा असेल तर शासनाला आपली भूमिका बजावावी लागेल.

समाजात विषमता आहे. समता आपोआप स्थापन होणार नाही. ती स्थापावी लागेल आणि त्यात शासनाला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल. शाहू

महाराजांची आर्थिक धोरणे नसली, तरी त्या आर्थिक धोरणांमागील दिशा आणि मुख्य सूत्र आजही अनुकरणीय आहे.

खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्यांनी "शाहू महाराज की जय" म्हणताना शाहू महाराजांचे आर्थिक धोरणही समजावून घ्यावे.

❑❑❑

# शाहू महाराज आणि कामगार चळवळ

राजर्षी शाहू महाराज २६ जून १८७४ रोजी जन्मले. त्यांनी २ एप्रिल १८९४ रोजी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली आणि २८ वर्षे कारभार केल्यानंतर ६ मे १९२२ रोजी त्यांचे अल्पवयात दु:खद निधन झाले.

शाहू महाराजांचा काळ लक्षात घेता महाराष्ट्रात व देशात नुकतीच कुठे कामगार चळवळीस सुरुवात झाली होती. अजून कामगारांत पुरेशी जागृती निर्माण व्हायची होती; अजून कामगार नीट संघटित व्हायचे होते. आयटक (ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस) या पहिल्या अखिल भारतीय कामगार संघटनेची स्थापना १९२० साली झाली. लाला लजपतराय तिचे पहिले अध्यक्ष होते. मुंबईस कामगार संघटना होण्यास सुरुवात झाली होती. राष्ट्रीय काँग्रेसचे नेते कामगार चळवळीत सहभागी होऊ लागले होते. १९०८ सालीच मुंबईच्या कामगारांनी लो. टिळकांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेच्या निषेधार्थ सहा दिवसांचा राजकीय संप केला होता. ब्रिटिश सरकार कामगार संघटनांकडे विरोधानेच पाहत होते. फारसे कामगार कायदे अस्तित्वात नव्हते.

काळ हा असा होता आणि शाहू महाराज ब्रिटिश पोलिटिकल एजंटच्या करड्या नजरेखाली एक सिंहासनाधिष्ठित संस्थानिक होते. त्याचबरोबर ते छत्रपती शिवाजींचे वारस होते. या वारशाची एक व्यापक स्वीकारार्हता व आदराची भावनाही होती. मुंबईचा कामगार महाराष्ट्रातूनच मुंबईस आलेला होता. अशा अवस्थेत शाहू महाराजांची कामगार व कामगार संघटना यांसंबंधी भूमिका काय होती, व्यवहार काय होता हे पाहावयाचे आहे.

१० नोव्हेंबर १९१८ रोजी शाहू महाराजांच्या मुंबईतील परळ भागात कामगार मेळाव्यात अध्यक्षपदावरून केलेले एक भाषण आणि २४ नोव्हेंबर १९१८ रोजी

'पिपल्स युनियन' या कामगार संघटनेच्या स्थापनादिनी उद्घाटक म्हणून केलेले भाषण या दोन भाषणांमधून शाहू महाराजांची कामगार व कामगार संघटना या विषयांवरची मते व व्यवहार स्पष्ट होतो.

## संघटित व्हा!

पहिल्या भाषणात शाहू महाराज म्हणाले होते, "मुंबई शहर हे व्यापार व उद्योगधंदा या बाबतींत सुप्रसिद्ध आहे. धनिकांचे भांडवल व कारखानदारांचे व्यवस्थापनचातुर्य यांवरच हा व्यापार व उद्योगधंदा अवलंबून आहे, अशी आजपर्यंत समजूत होती. पाश्चात्त्य देशांत भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग आहेत. तिकडेही भांडवलदार लोकांची मजूरदार लोकांवर बेसुमार सत्ता चाले. पण आता मजूरदार लोकांनी आपले संघ बनविले आहेत. गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते. पण अशा अनेक काड्यांचा वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येईल."

त्यानंतर महाराज पुढे म्हणतात, "...इंग्लंडात मजूरदारांनी आपल्या उन्नतीकरिता आपले संघ स्थापून स्वावलंबनाचे मार्ग स्वीकारले, त्याप्रमाणे आपण आपले सुव्यवस्थित संघ स्थापन केले पाहिजेत."

महाराजांच्या या भाषणातून काही मुद्दे त्यांनी स्पष्टपणे मांडले आहेत. कारखानदारीत धनिक आणि कारखानदार यांच्या भांडवल आणि व्यवस्थापनचातुर्य यांबरोबरच कामगारांचे श्रम महत्त्वाचे असतात असे त्यांनी सूचित केले आहे.

पाश्चात्त्य देशात भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग आहेत हे स्पष्टपणे नोंदवून त्यांच्या हितसंबंधातील विरोध सूचित केला आहे आणि भांडवलदारांच्या बेसुमार सत्तेस विरोध करण्यासाठी कामगारांनी संघ स्थापून या सत्तेस अटकाव केला आहे, असे सांगितले आहे.

आपल्या देशातील कामगारांनीसुद्धा त्याप्रमाणे संघ स्थापून आपल्या हितसंबंधांचे संरक्षण करावे, असे त्यांनी मार्गदर्शन केले आणि कामगारांत आत्मविश्वास जागृत होऊन त्यांना संघटित व्हायला बळ प्राप्त व्हावे म्हणून 'गवताची एक काडी दुबळी परंतु अनेक काड्यांचा वेठ वळला तर तो हत्तीपेक्षा बलवान' असे सांगितले आहे.

एक संस्थानिक कामगारांना संघटित व्हायला सांगत होता! हे नीट लक्षात घ्यावे.

## "वर्ग आणि जात - दोन्हीविरोधी संघर्ष करा"

पाश्चात्त्य देशातील कामगारांचे संघटित होण्याबाबत अनुकरण करा असे

आवाहन करताना राजर्षी शाहू महाराजांचे भारतीय समाजातल्या 'जात' या भयानक वेगळ्या वास्तवाकडे दुर्लक्ष झालेले नाही. ते म्हणतात,

"मजूरदार लोकांना विलायतेत मजुरी वाढवावी एवढ्याकरिताच झगडावें लागते. तेथील समाजामध्ये कोणत्याही दर्जास पोहोचण्यास जन्मसिद्ध अडचणी मुळीच नाहीत." त्या समाजात इतर काही अडचणी असतील परंतु 'जन्मसिद्ध अडचणी' नाहीत यावर महाराजांचा भर होता. याच भाषणात पुढे महाराजांनी जात आणि वर्ग यांचा प्रश्न मांडला आहे. ते म्हणतात,

"मजूरदारांचे इतर संबंध भांडवलदारांच्या इतर संबंधांशी विरोधी असल्यामुळे ह्या मंडळीतील प्रतिनिधीकडून मजूरदार लोकांच्या हक्कांचे संरक्षण नव्हते, अशी स्थिती इंग्लंडात होती. तशी स्थिती इथेही आहे. पुढारलेल्या वर्गाकडून मागासलेल्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण होणे शक्य नाही. याचकरिता जातवार किंवा वर्गवार मतदारसंघातर्फे यांच्यातील प्रतिनिधी निवडून आले पाहिजेत."

शाहू महाराजांनी या ठिकाणी केवळ जातवार मतदारसंघ न मागता जातवार किंवा वर्गवार मतदारसंघ मागितला हे लक्षात यावे.

अर्थात, महाराजांचे विचार आणि भाषणे यांचे अर्थ लावताना आणि त्यातील सुसंगती किंवा विसंगती शोधताना एक गोष्ट लक्षात ठेवावी. महाराष्ट्रातील साक्षेपी प्रबोधनकार श्री. गं. बा. सरदार यांनी म्हटल्याप्रमाणे "महाराजांची भूमिका तत्त्वचिंतकाची नसून कृतिशील समाजसुधारकाची होती."

जातींच्या प्रश्नांची अधिकतर तीव्रता महाराजांनी नंतरच्या दुसऱ्या भाषणात अधिक स्पष्टपणे मांडली आहे. ते म्हणाले, "...आपले संघ बनवून भांडवलवाल्यांचा जुलूम नाहीसा करणे जितके महत्त्वाचे आहे व त्यापेक्षाही हे बनावटी धार्मिक गट काढून टाकणे जास्त जरुरीचे आहे. आमच्याकडे आहे त्या प्रकारचा जातिभेद दुनियेत कोठेही सापडावयाचा नाही."

भारतीय समाजव्यवस्थेत जातीचा प्रश्न अधिक तीव्र आहे असे महाराजांना वाटत होते हे स्पष्टच आहे. याच भाषणात महाराज म्हणाले होते, "इथे इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वांस आपले हक्क काय आहेत हे कळले पाहिजे. भांडवलवाल्यांत ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचा भरणा विशेष आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणे कठीण आहे."

१९७४ साली कॉ. वैद्य यांनी 'म. फुले आणि त्यांची परंपरा' हा ग्रंथ लिहिला. 'शाहू महाराजांच्या कार्याची ऐतिहासिक महती' या लेखात महाराजांच्या या कार्याचे मूल्यमापन केले आहे ते योग्यच आहे. कॉ. वैद्य म्हणतात, "...अखेरच्या दिवसांत टिळकांप्रमाणेच शाहू महाराज हेही उदयोन्मुख कामगारवर्गाकडे आकृष्ट झाले होते.

मुंबईत मजुरांच्या सभेत भाषण करताना त्यांनी कामगारांच्या वर्गीय शक्तीचे स्वागत केले. ट्रेड युनियन बांधण्याच्या हक्काचा नि:संदिग्ध पुरस्कार केला. पण एवढ्यावरच न थांबता त्यांनी भांडवलदारांविरुद्ध कामगारवर्गाच्या लढ्याची महती वर्णन केली.

"अर्थातच, भांडवलदारांत मुख्यत: भटजी आणि शेटजी आहेत हे महाराजांनी सांगितले असले, तर ते आपण तत्कालीन संदर्भात आणि परिभाषेत समजून घेण्याचा प्रयत्न करावा. पण भटजीबरोबरच शेटजी हा बहुजन समाजाचा शत्रू म्हणून उघड नाव घेणे आणि तो शेटजी म्हणजे भांडवलदारवर्ग असा त्याचा गर्भित अर्थ कामगारांसमोर स्पष्ट करणे ही गोष्ट तेव्हा तरी अपूर्व होती यात शंका नाही."

शाहू महाराजांनी त्या काळी कामगार आणि शेतकरी एकच आहेत आणि दोघांचे वर्गीय व वर्णीय हितसंबंध एकच आहेत असे प्रतिपादन केले आणि दोघांचे शत्रू शेटजी (भांडवलवाले) व भटजी आहेत असे आवर्जून सांगितले आणि स्वत: राजा असतानासुद्धा आपल्या शेतकरी पार्श्वभूमीचा अभिमानाने उल्लेख केला असून स्वत:स राजा म्हणवून घेण्यापेक्षा शेतकरी म्हणवून घेणे जास्त आवडते असे सांगितले आहे. ते म्हणतात, "...आता आपल्या हिंदुस्थानातील स्थिती पाहू गेल्यास इकडे मुख्य मागासलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आहे व मीही त्यांपैकीच एक आहे. कारखान्यात मजुरी करणारे आपण सर्व शेतकरीच आहोत. तेव्हा सर्वांविषयी एकच विचार करणे सोयीचे आहे. मजूरदार व इतर मागासलेला वर्ग यांच्या हिताचे संरक्षण करणे या हिंदुस्थान देशातही जरुरीचे आहे..."

स्वत:स शेतकरी किंवा मजूर म्हणवून घेण्यात वाटत असलेला अभिमान महाराजांनी अनेक वेळा बोलून दाखवला आहे.

कानपूर येथे कुर्मी समाजाची परिषद एप्रिल १९१९ मध्ये भरली होती. या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात सुरुवातीला शाहू महाराज म्हणाले,

"...मी तुमच्यापैकीच एक आहे. मला मजूर समजा, अगर शेतकरी समजा. माझे वाडवडील हाच धंदा करीत होते. जे काम माझे पूर्वज करीत होते तेच काम करणाऱ्या लोकांचा अध्यक्ष होण्याकरिता मला बोलविले आहे याचा मला अत्यानंद होतो आहे..."

राजा असून रयतेत मिसळण्याचा आणि आपण रयतेपैकीच एक आहोत असे सांगण्याचा शाहू महाराजांचा गुण वाखाणलाच पाहिजे.

## रशियातील कामगार राज्याचे स्वागत व अनुकरणाचे आवाहन

शाहू महाराज कामगारांना केवळ भांडवलवाल्या वर्गाच्या पिळणुकीविरुद्ध

संघटित होण्याचे आवाहन करून थांबले नाहीत, तर त्यांनी रशियात कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या राज्याचे उदाहरण देऊन तसे इथे व्हावे असे आवाहन केले आहे.

नोव्हेंबर १९१८ साली म्हणजे रशियात कामगारक्रांती झाल्यानंतर एका वर्षात महाराजांनी मुंबईस कामगारांसमोर भाषण केले. त्यात ते म्हणाले,

"पाश्चात्त्य देशांत भांडवलवाले व मजूर या पक्षाचे भांडण चालले आहे असे मी पूर्वीच सांगितले आहे. मजूर पक्षाच्या हाती राज्यकारभार बहुतांशी जाणे असा परिणाम या युद्धाचा (पहिले जागतिक युद्ध) झाला आहे. रशिया व जर्मनी ही निरंकुश राजसत्तेची दोन मोठी पीठे होती. त्या ठिकाणी आता मजूर पक्षाच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताक राज्ये स्थापन होत आहेत. इंग्लंडातही मजूर पक्षाचा जोर जास्त वाढत आहे. हॉलंड वगैरे तटस्थ (युद्धात तटस्थ) राष्ट्रांवरही या लाटेचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. वयात आलेल्या प्रत्येक माणसास मत देण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, म्हणजे बहुजन समाजाच्या मताप्रमाणेच कारभार चालला पाहिजे. अल्पसंख्याकांची सत्ता कमी होणारच आणि आपणही असे अधिकार मिळविले पाहिजेत व त्याकरिता स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न सतत नेटाने केले पाहिजेत..."

या भाषणाचा अर्थ स्पष्ट आहे. रशियात आणि इतरत्र जे घडले त्याचे महाराजांनी स्वागत केले आणि तसे भारतात घडावे म्हणून प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे.

शाहूचरित्राचा, त्यांच्या विचार व व्यवहाराचा अभ्यासकांनी शाहू महाराजांच्या या उद्‌गारांशी अर्थ लावला आहे.

प्रा. एस. एस. भोसले म्हणतात, "१९२८ साली पहिल्या लोकसंघामध्ये राजर्षींनी श्रमजीवी लोकांना संघटित होण्याचा दिलेला महामंत्र दूरवरचा न्याहाळ स्पष्ट करणारा आहे."

प्रा. एन. डी. पाटील यासंबंधी म्हणतात, "कामगारांनी आपल्याकडे युनियन्स काढल्या पाहिजेत असे सांगणारा दुसरा एकही संस्थानिक शोधून सापडणार नाही. युरोपमध्ये रशियासारख्या देशात कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली त्यांचे राज्य स्थापन झाल्याचा दाखला देऊन हा लोकनेता येथील कामगारवर्गाला त्यांच्या सुप्त शक्तींची आणि ऐतिहासिक कर्तव्यांची जाणीव धीरगंभीरपणे करून देत होता आणि तेही अशा काळात की जेव्हा साम्यवादी चळवळीने या देशात मूळदेखील धरले नव्हते."

कॉ. प्रभाकर वैद्य यासंबंधी लिहितात, "...याही पलीकडे जाऊन महाराजांनी

रशिया आणि जर्मनीचा उल्लेख करणे आणि तेथील कामगारांनी झार आणि कैसरची जुलमी राजसत्ता उलथून पाडली आहे, याचा स्वागतपर उल्लेख करणे ही गोष्ट अधिकच महत्त्वाची आहे. तसा उल्लेख एका सिंहासनाधिष्ठित संस्थानिकाने करावा याचे तर आज अधिकच कौतुक वाटते...''

श्री. द्वा. भ. कर्णिक यांनी महाराजांचे हे भाषण देऊन म्हटले आहे की, ''...शाहू महाराजांनी द्रष्टेपणाच व्यक्त केला.''

## प्रतिमापूजन करा पण विचारांचे दफन होऊ देऊ नका

शाहू महाराजांच्या या विचारांकडे शाहूभक्तांचेसुद्धा जितके लक्ष जावे तितके गेलेले दिसत नाही. शाहूविचारांच्या विरोधकांनी या किंवा शाहूंच्या सर्वच विचारांकडे दुर्लक्ष करणे समजू शकते. त्यांना नुसता जयजयकार हवा. त्यांना नुसते प्रतिमापूजन हवे. प्रतिमापूजन करून विचारांचे दफन करणे त्यांच्या सोयीचे आहे.

शाहूभक्तांनी मात्र हे सारे नीट लक्षात घ्यायला हवे. प्रतिमापूजन करावे, परंतु विचारांचे दफन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

शोभायात्रा काढाव्यात परंतु विचारयात्राच टिकाऊ असतात याचेही भान ठेवावे.

❑❑❑

# राजर्षी शाहू महाराज आणि धर्म

प्रत्येक काळात पुरोगामित्वाची काही खास कसोटी तयार होत असते. तो त्या त्या काळाचा महिमा असतो. परधर्मासंबंधीचा दृष्टिकोन काय आहे? ही आताच्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील पुरोगामित्वाची एक महत्त्वाची कसोटी आहे.

मुस्लीम धर्मावर आधारलेले एक स्वतंत्र राष्ट्र—पाकिस्तान—अस्तित्वात येऊनही भारताने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा आग्रह धरून राष्ट्र उभारले. भारतीय राज्यघटनासुद्धा धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर उभारलेली आहे. धर्म कोणताही असला तरी भारतातील सर्व नागरिकांना समान रितीने वागवण्याची घटनेची आज्ञा आहे. असे असतानासुद्धा सध्या भारतात स्वधर्मप्रेमाऐवजी परधर्मद्वेष करणारी व्यक्ती जास्त लोकप्रिय होताना दिसते. स्वत:चा धर्मसुद्धा न पाळणारे परधर्माला जर शिवीगाळ करीत असतील, तर ते नायक बनतात. अशा अवस्थेत राजर्षी शाहू यांचा परधर्मासंबंधीचा दृष्टिकोन काय होता हे पाहणे उद्बोधक ठरेल.

राजर्षी शाहू हे छत्रपती शिवाजी महाराजांचे वारस होते. त्यांच्या इतर वारसांबरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांचा परधर्मासंबंधीच्या दृष्टिकोनाचा वारसा राजर्षी शाहू चालवत होते, असे निश्चित म्हणता येईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यातील सैनिकांना जे अनेक अपूर्व आदेश दिले होते, त्यांतील एक मुस्लीम धर्मीयांचा पवित्र ग्रंथ कुराणासंबंधी होता. शिवाजी महाराजांनी आज्ञा केली होती की "लढाईच्या धुमश्चक्रीत मुसलमान धर्माचा पवित्र ग्रंथ जर हाती आला, तर तो पूज्यभावाने आपल्या सैन्यातील मुसलमान सैनिकास सुपूर्द करावा. आपला धर्म आपणास प्यारा, त्यांचा धर्म त्यांना प्यारा."

राजर्षी शाहूंचेही धोरण असेच होते. कर्नाटक ब्राह्मणेतर परिषदेसमोरच्या

भाषणात राजर्षी शाहूंनी शिवाजी महाराजांचेच उदाहरण दिले आहे."औरंगजेब व शिवाजी यांचे वेळी उभय पक्षांत हिंदू व मुसलमान सरदार होते. त्यांनी राष्ट्रोन्नतीस विघातक अशा मागण्या केल्या होत्या काय?" पुढे ते म्हणतात, "मुसलमान हे मराठ्यांप्रमाणे क्षात्रधर्म करतात. त्यांच्या चालीरीतीही बहुतेक मराठ्यांप्रमाणे आहेत. मराठ्यांच्या फौजेत मोठे मोठे मुसलमान सरदार होते. त्याप्रमाणेच मुसलमानांच्या फौजेत मराठे सरदार होते."

कोल्हापुरात जी वसतिगृहे स्थापन केली त्यात ज्याप्रमाणे हिंदू धर्मातील अनेक जातींची जातवार वसतिगृहे आहेत, तशीच इतर धर्मीयांचीही आहेत. मुसलमान धर्मीयांचे वसतिगृह आहे, जैनांचे आहे, लिंगायतांचे आहे, ख्रिश्चनांना तर मोठमोठ्या जागा दिल्या आहेत. प्रजेचा धर्म पाहता सर्वांना समानतेने वागवावे असे राजर्षी शाहूंचे धोरण होते. शाहू महाराजांचा जयजयकार करताना शाहूंचे हे धोरण लक्षात ठेवून जयजयकार करावा.

## खरा धर्म

शाहूराजांनी धर्माचाही व्यापक व खोल विचार केला होता आणि सर्व धर्मांची मूलतत्त्वे एकच आहेत असे त्यांचे मत होते. त्यांचा व्यवहारही तसाच राहिला आहे.

नागपूर येथील मे १९२०च्या एका भाषणात शाहू महाराज म्हणाले आहेत,

"दया धरम का मूल है, नरक मूल अभिमान ।।

"यावरून पाहता देशाची म्हणजे देशबंधूंची सेवा करणे, जनी जनार्दन शोधणे व पाहणे हाच खरा धर्म आहे. याबाबत सर्व धर्मांचे ऐक्य आहे. परोपकार हा पुण्यमार्ग आहे व परपीडा हे पाप आहे, असेच सर्व प्रतिपादन करतात. याप्रमाणे विचार केल्यास धर्मभेदांच्या सबबीवर एकमेकांचा मत्सर करणे अगदी चूक आहे."

महाराजांच्या उद्‌गारातून व्यक्त झालेला धर्म आजही अनुकरणीय आहे. विशेषत: हिंदूंनी मुसलमानांना भोसकणे, हिंदूंनी मुस्लीम स्त्रियांवर बलात्कार करणे, हिंदूंनी मुसलमानांची घरे जाळणे, मुसलमानांनी हिंदूंना भोसकून मारणे, मुस्लिमांनी हिंदू स्त्रियांवर बलात्कार करणे, मुस्लिमांनी हिंदूंची घरे जाळणे हे मोठ्या प्रमाणावर चालू आहे आणि दुसऱ्या धर्मातील स्त्री-पुरुषांना जो जास्त त्रास देईल तो खरा धार्मिक; असे जेव्हा चालू आहे तेव्हा शाहू महाराजांचा विचार फारच उपकारक आहे. परपीडा हे पाप आहे हा शाहूंचा संदेश त्यांचा जयजयकार करताना लक्षात असावा.

## राष्ट्र आणि धर्म

धर्माचा आणि व्यक्तीचा तसेच धर्माचा आणि राष्ट्राचा संबंध काय असावा यासंबंधी त्याच भाषणात महाराज म्हणतात, "आम्ही सर्व हिंदी आहोत, बंधू आहोत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे व धर्माचे असोत; ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल. पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये. यापुरते धर्म ही बाब फारच कमी महत्त्वाची आहे असे मला वाटते."

कर्मकांडात गुंतून बसणे हा धर्म नव्हे. टाळ कुटणे हा धर्म नव्हे. अनवाणी यात्रा करणे हा धर्म नव्हे, तर देशबांधवांची सेवा करणे हाच धर्म आहे हा त्यांचा संदेश आहे.

❑❑❑

# शाहू महाराज : वसा आणि वारसा

आज शाहू महाराज नाहीत परंतु आपण आहोत. ते ब्रिटिशांचे मांडलिक असलेले एक संस्थानिक होते; आपण नाही आहोत. ते १९२२ साली निधन पावले. आता आपण २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर आहोत. त्यांच्या आणि आपल्या काळात कितीतरी फरक पडलाय. मग आता आपण शाहू महाराजांच्या कोणत्या कार्याचे अनुकरण करायचे? त्यांचा कोणता विचार घ्यायचा? काळानुसार त्यांचा कोणता विचार विकसित करायचा? त्यांच्या विचारात कोणती भर घालायची? हे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

शाहू महाराज चांगले शिकारी होते, ते घोड्यावर उत्तम रितीने मांड टाकून रपेट करीत असत. त्यांनी अस्वलाशी झुंज दिली होती. हे सारे त्यांना आणि त्यांच्या काळात शोभून दिसणारे उत्तम गुण होते. परंतु आता आपण या गोष्टींचे अनुकरण करू शकत नाही. करूही नये.

ब्रिटिशांचे मांडलिक संस्थानिक म्हणून त्यांच्या कार्यावर मर्यादा लादलेल्या होत्या. आपणापैकी कुणावर त्या नाहीत. त्यामुळे तेव्हाच्या प्रस्थापित ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध बोलताना आणि वागताना त्यांना सावधगिरी बाळगावी लागत होती. साम्राज्यशाहीविरुद्धचा लढासुद्धा त्यांच्या काळात तीव्र झाला नव्हता. आपणावर आता त्या मर्यादा नाहीत. आपल्या देशात येऊन इथे राहून राज्य करणारी आणि त्या राज्याआधारे आपल्या देशाचे शोषण करणारी साम्राज्यशाही आता नाही; परंतु साम्राज्यशाही आहे. जगातले इतर समर्थ देश आपल्या देशाचे आर्थिक शोषण करीत आहेत. आपण त्यांच्या विरुद्ध लढले पाहिजे.

शाहू महाराजांनी भटभिक्षुकांविरुद्ध आणि पुरोहितशाहीविरुद्ध दंड थोपटून बंड केले. परंतु ब्राह्मणांच्या पुरोहितशाहीऐवजी ब्राह्मणेतरांच्या पुरोहितशाहीचा पुरस्कार

केला. आता विज्ञानाची खूपच प्रगती झाली आहे. आपले जगाचे ज्ञान विकसित झाले आहे. आता आपण केवळ 'ब्राह्मणांची पुरोहितशाही' नको, असे म्हणून थांबू नये, तर कसलीच आणि कुणाचीच पुरोहितशाही नको यासाठी जागृती करून संघर्ष केला पाहिजे.

शाहू महाराजांनी स्थापलेल्या क्षात्रजगद्गुरूला नमस्कार करायला त्यांच्यासमोरच भास्करराव जाधवांनी नकार दिला होता. महाराजांनी रागावून त्यांना तिथून निघून जायची आज्ञा केली होती. जाधवांनी ती आज्ञा महाराजांना मुजरा करून पाळली. परंतु मागाहून महाराज लगेच भास्कररावांना भेटले आणि त्यांच्या विचाराचे व व्यवहाराचे कौतुक केले होते. खुद्द प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनीच हे सारे लिहून ठेवले आहे.

सामाजिक समतेसाठी शाहू महाराजांनी संघर्ष केला ती सामाजिक समता अजून प्रस्थापित व्हायची आहे. सामाजिक समतेसाठीचा संघर्ष आपणास नव्या जोमाने, नव्या विचाराने चालू ठेवला पाहिजे. शाहू महाराजांनी १९०२ साली राखीव जागांचा कायदा केला. आज शाहू महाराजांचा जयजयकार करणारे राखीव जागांना विरोध करत आहेत. आपण राखीव जागांना पाठिंबा दिला पाहिजे.

राखीव जागांच्या मर्यादांचे भान महाराजांना होते असे दिसते. मागासलेल्यांचा कैवार घेताना जातिभेदाची तीव्रता वाढणार नाही आणि जातिअंताचा संघर्षच दुर्लक्षित होणार नाही, याची काळजी घेण्याची गरज महाराजांनी प्रतिपादिली होती. उत्तरेत लखनौला शाहू महाराजांचा उत्सव प्रचंड जयघोषात आणि समारंभात करणारा बहुजन समाज पक्ष मागासांच्या कैवाराच्या नावाखाली जातिद्वेषाची तीव्रता वाढवताना, जातिअंताचा संघर्ष दुबळा करताना आणि संधिसाधू राजकारण करून 'मनुवाद्यांशी' तडजोड करताना आपण पाहतो आहोत. हे शाहू महाराजांचे अनुकरण नव्हे.

मागासलेल्यांचा कैवार घेतलाच पाहिजे. मागासांना संघटित करून संघर्ष तर केलाच पाहिजे. परंतु सर्व प्रकारची समता प्रस्थापित करण्याचा आणि जातिअंताचा संघर्ष दुबळा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. महाराजांच्या विचारांत आणि व्यवहारात संधिसाधूपणा नव्हता. त्यांचे नाव घेऊन पुन्हा कुणी संधिसाधूपणा करत असतील, तर ते महाराजांचे अनुयायी नव्हेत असे स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

भटजींबरोबर शेटजी हा आपला शत्रू आहे. शेटजी म्हणजे भांडवलदार हे शाहू महाराजांनी अगदी उघड करून स्पष्टपणे सांगितले होते. रशियात कामगारांच्या पक्षाच्या नेतृत्वाखाली जुलमी सत्ता उलथून टाकल्याबद्दल रशियन कामगारांचे

महाराजांनी कौतुक केले होते आणि त्या कामगारांसारखे संघ स्थापायला कामगारांना आवाहन केले होते. त्यांचा हा विचार शास्त्रशुद्ध बनवून आपण संघर्ष केला पाहिजे.

शेटजी आणि भटजी हे आज बहुजन समाजाचे, दलितांचे आणि कामगार, शेतकऱ्यांचे शत्रू आहेत. आजचे भटजी देवाच्या नावाने मते मागून राज्य करू पाहत आहेत. या भटजींचे आजच्या शेटजींशी म्हणजेच भांडवलदारांशी संगनमत आहे. ते दोघे आता एकत्र आहेत.

आजच्या भाषेत बोलायचे तर वर्णवर्चस्वाविरुद्ध आणि वर्गवर्चस्वाविरुद्ध लढले पाहिजे. दोन्हीपैकी कोणते आधी यासंबंधीसुद्धा महाराजांनी विचार मांडला. आणि दोन्ही एकदम हातात हात घालून एका गाडीच्या दोन चाकांप्रमाणे एकमेकांवर पूर्ण अवलंबून आहेत. अशा रितीने हा संघर्ष करावा असेच त्यांचे म्हणणे होते.

जयजयकाराच्या गदारोळात विचारांची पीछेहाट होऊ नये. प्रतिमांचे पूजन करताना विचारांचे दफन होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रतिमा पुजावी परंतु तेवढेच करून थांबू नये. महाराजांचा विचार समजून घ्यावा पण तेवढेच करून थांबू नये. त्या विचारांआधारे कार्य करावे.

राजर्षी शाहू महाराज हा एक कार्यकर्ता राजा होता हे लक्षात ठेवावे.

❑❑❑

124266
31.3.08

आज आपणास आणखी एक विचित्र स्थिती दिसते. सरकारी-निमसरकारी नोकऱ्यांत राखीव जागा ठेवण्यास विरोध करणारेसुद्धा शाहू राजांचा जयजयकार करतात आणि राखीव जागा असाव्यात असे म्हणणारेही जयजयकार करतात. गोरगरीब शेतकऱ्यांची कष्टाची शेती पिकावी म्हणून त्यांना धरणे बांधून, सवलती देऊन मदत करावी म्हणणारेही शाहूप्रतिमेचे पूजन करतात आणि ज्याचे त्याने पाहावे, सरकारने कुणालाही मदत वगैरे करू नये असे म्हणणारेही करतात. चातुर्वर्ण्याचा, सतीप्रथेचा, उच्च-नीचतेचा पुरस्कार करणारेही 'शाहू महाराज की जय' म्हणतात आणि त्याला विरोध करणारेही तेच करतात. कामगारांनी आपले संघ स्थापून भांडवलदारांच्या पिळणुकीस विरोध करावा अशा मुंबईच्या कामगारांसमोर भाषण करताना शाहू महाराजांनी जाहीरपणे व्यक्त केलेल्या विचारासारखे विचार स्वीकारून संघटना स्थापणारे व चालवणारेही शाहू उत्सवात सहभागी होतात आणि कामगार संघटनांना विरोध करणारेही उत्सव करतात. बहुजनांना शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे असे सांगणाऱ्या शाहू महाराजांच्या विचाराप्रमाणे ती मागणी आजही करणारे शाहूभक्त आहेत आणि शिक्षणाचे खाजगीकरण करावे, शिक्षण ही शासनाची जबाबदारी नाही असे म्हणणारेही ... यांतले शाहू राजांचे खरे वारस कोण? आ... आहेत?

Library IIAS, Shimla
MR 923.6 P 195 R
00124266

शाहू महाराजांच्या विचारांच्या व भूमिकेच्या आधारे या प्रश्नांचा तपास घेणारे महत्त्वाचे पुस्तक.

किंमत : ५० रुपये

ISBN 81-82284-89-0